दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव • लातूर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक
बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१६० | रविवार दि.३० ऑगस्ट २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

# ऊसतोडीसाठी पैसे मागितल्यास कारवाई

## साखर आयुक्तांचे कारखान्यांना निर्देश; मजूर, मुकादम, वाहतूक कंत्राटदारांच्या बिलातून रक्कम वसूल करून शेतकऱ्यांना परत देण्याची सूचना

**पुणे । प्रतिनिधी**

**आगामी २०२६–२७ ऊस गाळप हंगामाच्या पार्श्वभूमीवर ऊस उत्पादक शेतकऱ्यांची होणारी आर्थिक पिळवणूक रोखण्यासाठी साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांनी महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. ऊस तोडणी मजूर, ऊसतोड टोळ्या, मुकादम किंवा वाहतूक कंत्राटदारांकडून ऊस तोडणीसाठी शेतकऱ्यांकडे पैसे अथवा अन्य वस्तू, सेवांची मागणी होत असल्याचे आढळून आल्यास संबंधितांवर कारवाई करावी, असे निर्देश साखर आयुक्तांनी राज्यातील सर्व साखर कारखान्यांना दिले आहेत. याबाबत परिपत्रक जारी करण्यात आले आहे.**

ऊसतोडणीसाठी शेतकऱ्यांकडून विविध कारणे सांगून पैशांची मागणी केली जात असल्याच्या तक्रारी दरवर्षी प्राप्त होतात. ऊस पीक चांगले नाही, ऊस खराब आहे, ऊस पडलेला आहे, शेतातील क्षेत्र अडचणीचे आहे किंवा तोडणी करणे परवडत नाही, अशी कारणे सांगून ऊसतोड मजूर व मुकादमांकडून पैसे मागितले जातात. मागणीनुसार पैसे न दिल्यास ऊस तोडणीस टाळाटाळ केली जाते.



### तक्रारीसाठी व्हॉट्सअॅप क्रमांक जारी करण्याची सूचना

शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक रोखण्यासाठी प्रत्येक साखर कारखान्याने अशा प्रकारच्या गैरव्यवहाराला आळा घालावा. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना तक्रार करता यावी यासाठी मोबाईल फोन अथवा व्हॉट्सअॅप क्रमांक उपलब्ध करून द्यावा आणि त्याची माहिती शेतकऱ्यांपर्यंत वेळोवेळी पोहोचवावी, असेही साखर आयुक्तांनी निर्देशित केले आहे.

परिणामी, ऊस लवकर गाळपासाठी जावा यासाठी शेतकरी नाईलाजाने या मागण्या पूर्ण करतात. गाळप हंगामात वाहतूकदार किंवा ट्रॅक्टरचालकांकडून 'एन्ट्री'च्या नावाखाली अतिरिक्त पैशांची मागणी केली जाते. तसेच ऊसतोड टोळ्यांकडून मटण, चिकन अथवा रोख रकमेची मागणी केली जाते. 'खुशाली'च्या नावाखाली तोडकऱ्यांकडून गुंठ्याला ठराविक रक्कम आकारली जात असल्याच्या तक्रारीही शेतकऱ्यांकडून केल्या जातात. या प्रकारामुळे ऊस उत्पादकांवर अनावश्यक आर्थिक भार पडतो. शेतकऱ्यांकडून ऊस तोडणीसाठी पैशांची मागणी अथवा आर्थिक पिळवणुकीबाबत ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### २ माजी आमदारांसह ४० जणांवर गुन्हा दाखल

सांगली : सांगलीच्या जत तालुक्यात आंदोलन करणाऱ्या दोन माजी आमदारांसह ४० जणांविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. जत शहरातील महाराणा प्रताप चौकात जत तालुक्याच्या नामांतरासह पाण्याच्या मागणीसाठी सर्वपक्षीय आंदोलन करण्यात आले होते. यावेळी रास्ता रोको करत राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक रोखल्याचा आरोप पोलिसांनी केलाय. जिल्हाधिकाऱ्यांच्या बंदी आदेशाचा भंग केल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली. माजी आमदार विलासराव जगताप, माजी आमदार विक्रमसिंह सावंत, जिल्हा बँकेचे संचालक प्रकाश जमदाडे आणि मन्सूर खतीब यांच्यासह अनेक प्रमुख नेत्यांचा आरोपींमध्ये समावेश आहे. जत पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून भारतीय न्याय संहिता, महाराष्ट्र पोलिस अधिनियम आणि राष्ट्रीय महामार्ग कायद्यानुसार कारवाई करण्यात आलीय. या कारवाईमुळे सांगलीच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

### ममता बॅनर्जी यांच्यावर हायकोर्टाच्या आदेशाने गुन्हा

कोलकाताः पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. कोलकात्यातील हेस्टिंग्स पोलीस ठाण्यात ममता बॅनर्जी यांच्याविरोधात एफआयआर दाखल करण्यात आला आहे. २८ ऑगस्ट रोजी कॅथेड्रल रोडवर तृणमूल काँग्रेसच्या विद्यार्थी परिषद स्थापना दिनानिमित्त रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीसाठी कोलकाता हायकोर्टाने रस्त्याचा केवळ एक भाग वापरण्याची परवानगी दिली होती. मात्र, रॅलीदरम्यान कार्यकर्त्यांनी रस्त्याच्या दोन्ही बाजू व्यापल्याचा आरोप आहे. त्यामुळे मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली. कार्यकर्त्यांनी बॅरिकेड हटवल्याचा आणि पोलिसांशी धक्काबुक्की केल्याचाही आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. दुपारी १२ ते ३ या वेळेत रॅली सुरू होती. हायकोर्टाच्या आदेशाचं उल्लंघन केल्याप्रकरणी आता गुन्हा दाखल झाला असून, या प्रकरणाचा पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

# हे शेवटचं आंदोलन; माघार नाही

## अंतरवालीतून जरांगे पाटलांचा पुन्हा एल्गार, पहिल्याच दिवशी प्रचंड गर्दी

**जालना । प्रतिनिधी**

मराठा आरक्षण आणि कुणबी प्रमाणपत्र, जात पडताळणी समिती या मुद्द्यांवरुन राज्य सरकारला इशारा दिल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी शनिवारपासून आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे. मराठा आरक्षण आणि कुणबी प्रमाणपत्राच्या मुद्यावरुन पुन्हा एकदा राज्यातील वातावरण चांगलंच तापल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. मराठा–कुणबी, कुणबी–मराठा जात प्रमाणपत्रासाठीच्या वंशावळ जुळवणी समितीला आणखी एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे.



मात्र, जरांगे पाटलांनी उपोषणाला सुरुवात केली असून, पहिल्याच दिवशी मोठ्या संख्येनं मराठा बांधव अंतरवाली सराटीत दाखल झाल्याचे दिसून आले. या बाधवांना जरांगे पाटलांनी संबोधित करताना, लवकरच मुंबई गाठण्याची तारीख जाहीर करू असे म्हटले.

आपल्याला महाराष्ट्रातील, मुंबईतील मराठ्यांनी नावं नाही ठेवले पाहिजे, हेही संस्कार जपले पाहिजेत. यावेळी, विजयापासून लांब जाऊ द्यायचं नाही ही जबाबदारी आपली आहे. यंदाचे उग्र आंदोलन सुद्धा मराठ्यांच्या शांततेपणात उग्र वाटले पाहिजे. हे शेवटच आंदोलन, याच्या मागणीत एकही माघार नाही. महाराष्ट्रातील बांधव बोलावून मुंबईची तारीख ठरवणार आहे. तीन दिवसात मराठा मुंबईला नेऊन वापस आणलेला आपल्याला ▶▶ पान २ वर

# 'तुम्ही स्वत:ला देव समजता का?'

## मुंबई उच्च न्यायालयाने एफडीएला फटकारले, 'ते' ५ रेस्टॉरंट पुन्हा सुरू

**मुंबई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या परिसरातील पाच रेस्टॉरंटचे परवाने निलंबित करण्याच्या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयाने शनिवारी स्थगिती देत ती पुन्हा सुरू करण्यास परवानगी दिली आहे. या रेस्टॉरंटच्या नव्या तपासणीत खाद्य सुरक्षा नियमांचे ८८ टक्के पालन होत असल्याचे आढळून आले. यावेळी न्यायालयाने एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे आणि अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त करत अवमान कारवाईचा इशाराही दिला आहे.**

कार्यवाह मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. एमसीएने




एफडीएच्या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. स्वच्छतेतील कथित त्रुटी तसेच तृतीय पक्षाकडून रेस्टॉरंट चालविण्याशी संबंधित नियमभंगाच्या कारणावरून एफडीएने कारवाई केली होती. बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स परिसरातील एमसीएच्या जागेवर ही पाच रेस्टॉरंट आहेत. गुरुवारी झालेल्या नव्या तपासणीत ती खाद्य सुरक्षा नियमांचे ८८ टक्के पालन करत असल्याचे स्पष्ट झाले. ▶▶ पान २ वर

# नेपाळ महाप्रलय : मृतांचा आकडा ६०० वर, पावसामुळे पुन्हा पुराचा धोका?



**काठमांडू । वृत्तसंस्था**


नेपाळमध्ये अचानक आलेल्या पुरातील मृतांचा आकडा ६१६ वर पोहोचला आहे. तर जखमी आणि बचावलेल्या लोकांची संख्या २,३०१ आहे. नेपाळच्या आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या माहितीनुसार, २,४२६ लोक अजूनही बेपत्ता असून, चौथ्या दिवशीही बचावकार्य सुरू आहे. पावसामुळे ▶▶ पान २ वर

# सोनिया गांधींच्या आत्मचरित्रावरून काँग्रेस आक्रमक; 'भारतासाठीच वेगळी भूमिका का?'

**दिल्ली । वृत्तसंस्था**

**काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी यांचे बहुप्रतीक्षित आत्मचरित्र 'बिलाँगिंग : अ जर्नी ऑफ लव्ह' प्रकाशनाआधीच वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. या पुस्तकाच्या भारतातील प्रकाशनाबाबत पेंग्विन रँडम हाऊस इंडियाने समाजमाध्यमावर आपली भूमिका स्पष्ट केल्यानंतर काँग्रेस नेत्यांनी केंद्र सरकारच्या कथित दबावाचा तसेच अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा मुद्दा उपस्थित केला आहे.**

पेंग्विन रँडम हाऊस इंडियाने 'एक्स'वरील संदेशातून या प्रकरणी स्पष्टीकरण दिले. सोनिया गांधी यांचे पुस्तक प्रकाशित करण्यासाठी आम्ही उत्सुक होतो. मात्र, लेखकाने पुस्तकात मांडलेल्या बाबींची तथ्यपडताळणी करणे ही प्रकाशकाची जबाबदारी आणि अधिकार असल्याचे कंपनीने म्हटले आहे. तसेच या पुस्तकाचे भारतातील प्रकाशक पेंग्विन रँडम हाऊस इंडिया नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. पेंग्विनच्या या स्पष्टीकरणानंतर काँग्रेस नेत्यांनी कंपनीच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले आहेत. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अशोक गेहलोत यांनी दावा केला की, पुस्तकातील पंतप्रधान नरेंद्र मोदी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ तसेच चीनकडून भारतीय भूभागावर करण्यात आलेल्या कथित अतिक्रमणासंदर्भातील मजकूर हटविण्यासाठी पेंग्विनवर दबाव आणण्यात आला होता. सोनिया गांधी यांनी या मजकुरात बदल करण्यास ▶▶ पान २ वर




# 'देशाची शिक्षण व्यवस्था पूर्णपणे उद्ध्वस्त'; आयआयटी विद्यार्थ्याच्या मृत्यूवरून दीपके आक्रमक

**मुंबई । प्रतिनिधी**


आयआयटी दिल्लीतील ३१ वर्षीय विद्यार्थी ऋषिकेश कुमार यांच्या मृत्यूच्या घटनेवरून देशातील शिक्षण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहेत. कॉकरोच जनता पार्टीचे संयोजक अभिजीत दीपके यांनी देशाची संपूर्ण शिक्षण व्यवस्था उद्ध्वस्त झाल्याचा



आरोप करत विद्यार्थ्यांना अधिक आधार देण्याची गरज व्यक्त केली.

ऋषिकेश कुमार यांचा २२ ऑगस्ट रोजी लेक्चर हॉल कॉम्प्लेक्सच्या सहाव्या मजल्यावरून पडून मृत्यू झाला होता. पोलिसांना घटनास्थळी कोणतीही सुसाइड नोट आढळलेली नाही. त्यामुळे त्यांच्या मृत्यूमागील नेमके ▶▶ पान २ वर

# मराठा आरक्षण आंदोलनासाठी निघालेल्या एकाचा हृदयविकाराने मृत्यू



**गेवराई । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे यांच्या नेतृत्वाखाली सराटी आंतरवाली येथे सुरू असलेल्या आंदोलनात सहभागी होण्यासाठी निघालेल्या एका आंदोलकाचा हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने मृत्यू झाला. सुग्रीव बापू शिंदे असे मृत आंदोलकाचे नाव असून, ते केज तालुक्यातील नांदुर घाट येथील रहिवासी होते. ही दुर्दैवी घटना शनिवारी सकाळी गेवराई परिसरात घडली.

मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणाच्या मागण्यांसाठी शनिवारपासून सराटी आंतरवाली येथे उपोषण ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२९ ऑगस्ट २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २६.०० क्विंटल | २,५१० | २,८६० | २,६७१ |
| ज्वारी/हायब्रिड: ९०.०० क्विंटल | २,४०१ | ४,२५५ | ३,३६६ |
| मका/लोकल: ८.०० क्विंटल | २,४५३ | २,४५६ | २,४५४ |
| तूर :०.५० क्विंटल | ६,५०० | ६,५०० | ६,५०० |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ६४.५० क्विंटल | २,४४० | ३,१६१ | २,८३१ |
| मुग: ६.०० क्विंटल | ८,९०० | ९,२२५ | ९,०६२ |
| सोयाबीन: १९.५० क्विंटल | ५,९०० | ५,९०० | ५,९०० |
| हरभरा: २.०० क्विंटल | ४,९०४ | ६,००० | ५,४३५ |

# पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रण

## सर्वोच्च न्यायालयात याचिकेवर ३१ ऑगस्टला सुनावणी

**दिल्ली । वृत्तसंस्था**

**पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रणाच्या अंमलबजावणीदरम्यान ग्राहकांना पुरेशी माहिती दिली जात नसल्याचा मुद्दा आता सर्वोच्च न्यायालयात पोहोचला आहे. ई–२० पेट्रोलमध्ये नेमकं किती टक्के इथेनॉल आहे, याची माहिती पेट्रोल पंपावर स्पष्टपणे द्यावी, अशी मागणी करणाऱ्या याचिकेवर ३१ ऑगस्टला सुनावणी होणार आहे.**

नरेंद्र कुमार गोस्वामी यांनी ही याचिका दाखल केली आहे. न्यायमूर्ती एम. एम. सुंदरश आणि प्रसन्ना बी. वराळे यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर सुनावणी होणार आहे. या याचिकेत




भारताच्या इथेनॉल मिश्रण कार्यक्रमाला किंवा ऊर्जा स्वावलंबनाच्या धोरणाला विरोध करण्यात आलेला नाही. मात्र वाहनधारकांना पेट्रोलमध्ये नेमकं किती इथेनॉल आहे आणि त्यांच्या वाहनासाठी ते इंधन योग्य आहे की नाही, याची अधिकृत माहिती मिळत नसल्याचा दावा करण्यात आला आहे. पेट्रोल पंपावरील प्रत्येक इंधन भरण्याच्या नोजलवर इथेनॉलची अचूक टक्केवारी स्पष्टपणे नमूद करावी, अशी प्रमुख मागणी याचिकेत आहे. तसेच ग्राहकाला दिल्या जाणाऱ्या प्रत्येक इंधनाच्या बिलावरही पेट्रोलमधील इथेनॉलचे प्रमाण नमूद करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच वाहन कंपनी, मॉडेल, इंजिनचा प्रकार आणि उत्पादन वर्षानुसार कोणत्या वाहनासाठी कोणत्या प्रमाणातील इथेनॉल मिश्रित पेट्रोल योग्य आहे, याची माहिती देणारा अधिकृत वाहननिहाय डेटाबेस तयार करण्याची मागणी याचिकेत करण्यात आली आहे. याचिकाकर्त्यांनी स्वतःच्या २०१८ मध्ये तयार झालेल्या पेट्रोल वाहनाचा दाखला देत जुन्या वाहनांमध्ये ई–२० पेट्रोलचा वापर कितपत योग्य आहे, याबाबत स्पष्टता नसल्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. ई–२०मुळे वाहनाच्या इंधन कार्यक्षमतेवर, इंजिनच्या आयुष्यावर आणि ▶▶ पान २ वर

# लातूर परिसरात पावसाची दमदार हजेरी

**लातूर । प्रतिनिधी**

लातूर जिल्ह्यात सर्वत्र पावसाची प्रतीक्षा आहे. कारण खरीप पिके दुपार धरत असून, पिके संकटात सापडलेली असतानाच शनिवारी सायंकाळी ५ च्या सुमारास लातूर परिसरात पावसाने दमदार हजेरी लावली. पावसाळ्यात प्रथमच आज पावसाळी वातावरण पाहायला मिळाले. लातूर शहरात सखल भागात पाणीच पाणी झाले असून, नाले तुडुंब भरून वाहू लागल्याने अनेक ठिकाणी गटारीचे पाणी रस्त्यावर आले. त्यामुळे शहरातील नागरिकांची तारांबळ उडाली. दरम्यान, मागच्या ब–याच दिवसांपासून पावसाची प्रतीक्षा असताना लातूर परिसरात सायंकाळी ५ ते ६ दरम्यान दमदार पाऊस झाल्याने परिसरातील खरीप पिकांना दिलासा मिळाला आहे. परंतु अजूनही मोठ्या पावसाची प्रतीक्षा कायम आहे.

## अग्रलेख

# मतदार यादीचा कचरा; लोकशाहीची सुरक्षा धोक्यात!

### ३,४०० मतदार अर्ज झेरॉक्स दुकानात सापडणे हा निष्काळजीपणा नव्हे, तर लोकशाहीच्या गोपनीयतेवरील गंभीर आघात!

मतदार हा लोकशाहीचा मालक असतो आणि मतदार यादी ही लोकशाहीच्या अधिकाराचे अधिकृत दप्तर असते. त्यामुळे या दप्तरातील एकही कागद बेपर्वाईने हाताळला जाणे ही साधी प्रशासकीय चूक मानता येणार नाही. रायगड जिल्ह्यात निवडणूक आयोगाच्या प्रक्रियेशी संबंधित तब्बल ३,४०० मतदार अर्ज एका खासगी झेरॉक्स दुकानात आढळून येणे, ही घटना निवडणूक यंत्रणेच्या कार्यपद्धतीवरच गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे.

या अर्जांमध्ये मतदारांचे फोटो, पत्ते आणि अन्य वैयक्तिक माहिती असल्याचे समोर आले आहे. म्हणजेच नागरिकांनी निवडणूक यंत्रणेवर विश्वास ठेवून दिलेली संवेदनशील माहिती सरकारी यंत्रणेच्या चौकटीबाहेर गेली. प्रश्न फक्त एवढाच नाही की हे अर्ज झेरॉक्स दुकानात कसे पोहोचले? खरा प्रश्न असा आहे की मतदारांची वैयक्तिक माहिती कोणाच्या परवानगीने, कोणाच्या आदेशाने आणि कोणत्या साखळीतून खासगी व्यक्तीच्या हातात गेली? रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी पाच केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना निलंबित केले, ही प्राथमिक कारवाई स्वागतार्ह आहे. पण पाच कर्मचाऱ्यांना निलंबित करून प्रकरण संपवणे म्हणजे घराला आग लागल्यानंतर धूर दिसत असलेल्या खिडकीवर कुलूप लावण्यासारखे आहे. मूळ आग कुठे लागली आणि ती कोणी लावली, हे शोधणे अधिक महत्त्वाचे आहे. हा निवडणूक प्रक्रियेतील महत्त्वाचा घटक असला, तरी एवढ्या मोठ्या संख्येने गोपनीय अर्ज एका खासगी झेरॉक्स दुकानापर्यंत पोहोचण्यासाठी केवळ एका व्यक्तीची चूक पुरेशी आहे का? कागद कुठून बाहेर पडले, कोणाने नेले, झेरॉक्स कोणी काढल्या, त्याची प्रत कुठे गेली, त्याचा वापर झाला का आणि या प्रक्रियेत आणखी कोणाचा सहभाग होताया प्रत्येक प्रश्नाचे उत्तर मिळाले पाहिजे. याहून गंभीर बाब म्हणजे या प्रकरणाला आता राजकीय रंग चढला आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) यांच्याकडून निवडणूक प्रक्रियेत गैरप्रकारासाठी सरकारी यंत्रणेचा वापर झाल्याचे आरोप केले जात आहेत. दुसरीकडे भाजपकडून या प्रकरणाशी पक्षाच्या कार्यकर्त्यांचा संबंध नसल्याचे सांगितले जात आहे. आरोप-प्रत्यारोपांच्या या राजकारणात सत्य दडपले जाऊ नये. निवडणूक प्रक्रियेवरील संशय दूर करण्याची जबाबदारी सत्ताधारी पक्षाचीही आहे आणि निवडणूक आयोगाची तर सर्वाधिक आहे. कारण निवडणूक आयोग ही केवळ निवडणूक घेणारी संस्था नाही; ती निवडणुकीवरील जनतेचा विश्वास जपणारी संवैधानिक व्यवस्था आहे. मतदाराला जर असा संशय वाटू लागला की त्याने दिलेली माहिती सुरक्षित नाही किंवा मतदार यादीतील माहितीचा गैरवापर होऊ शकतो, तर लोकशाहीच्या संपूर्ण प्रक्रियेवर त्याचा परिणाम होतो. विशेषतः सारख्या मतदार यादी पुनरावलोकनाच्या प्रक्रियेत पारदर्शकता आणि गोपनीयता या दोन्ही गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. नागरिकांकडून कागदपत्रे आणि वैयक्तिक माहिती घेताना सरकार नागरिकाला सुरक्षिततेची हमी देते. त्या माहितीचे संरक्षण करण्याची जबाबदारीही त्याच यंत्रणेची आहे. त्यामुळे 'निलंबन' ही अंतिम कारवाई नसून चौकशीची सुरुवात असली पाहिजे. या प्रकरणाची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे. संबंधित अर्जांची संपूर्ण साखळी तपासली पाहिजे. सीसीटिव्ही फुटेज, झेरॉक्स दुकानातील नोंदी, अर्जांच्या हालचालींची कागदपत्रे, संबंधित अधिकाऱ्यांचे मोबाईल आणि डिजिटल रेकॉर्ड, तसेच अर्जांची प्रत काढण्यामागील कारण यांची तपासणी झाली पाहिजे. जर वैयक्तिक माहितीचा गैरवापर झाल्याचे आढळले, तर संबंधितांवर केवळ विभागीय कारवाई न करता लागू फौजदारी आणि निवडणूक कायद्यांनुसार कठोर कारवाई झाली पाहिजे. यासोबतच एक मूलभूत प्रश्नही उपस्थित होतोमतदारांची माहिती कागदावर फिरत राहणार की सुरक्षित डिजिटल प्रणालीत नियंत्रित पद्धतीने हाताळली जाणार? संवेदनशील सरकारी कागदपत्रांची प्रत काढण्यासाठी खासगी दुकानांचा वापर होत असेल, तर त्यासाठी जबाबदारीची स्पष्ट साखळी आणि नोंदणी व्यवस्था का नाही? लोकशाही केवळ मतदानाच्या दिवशी जिवंत राहत नाही. ती मतदार यादी तयार करण्यापासून सुरू होते. मतदाराचा अर्ज सुरक्षित ठेवण्यात प्रशासन अपयशी ठरले, तर मतदान केंद्रावरील पारदर्शकतेचे दावे कितीही केले तरी त्यावर प्रश्नचिन्ह राहणारच. म्हणूनच रायगडमधील ३,४०० अर्जांचे प्रकरण 'पाच निलंबित' या एका ओळीवर थांबवू नये. या कागदांचा प्रवास कुठून सुरू झाला आणि कुठे संपला, याचा संपूर्ण मागोवा घेतला पाहिजे. राजकीय हस्तक्षेप झाला का, प्रशासकीय संगनमत होते का, की ही केवळ निष्काळजीपणा होतायाचा निर्विवाद खुलासा जनतेसमोर झाला पाहिजे. कारण हा प्रश्न ३,४०० अर्जांचा नाही. हा प्रश्न प्रत्येक मतदाराच्या विश्वासाचा आहे आणि लोकशाहीत मतदाराचा विश्वास एकदा तुटला, तर तो कोणत्याही निलंबनाच्या आदेशाने पुन्हा जोडता येत नाही.

# लोकनेते गोपीनाथ मुंडे वृद्धाश्रमात रक्षाबंधनाचा अनोखा सोहळा

### वयोवृद्ध माता-माऊलींनी रामायणाचार्य संजय महाराज पाचपोर यांना बांधल्या राख्या

**बीड । प्रतिनिधी**

**घाटसावळी येथील लोकनेते गोपीनाथ मुंडे वृद्धाश्रम व व्यसनमुक्ती केंद्रात रक्षाबंधनाचा स्नेहपूर्ण सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार तथा रामायणाचार्य संजय महाराज पाचपोर यांनी वृद्धाश्रमाला भेट दिली. यावेळी वयोवृद्ध माता-माऊलींनी त्यांना राख्या बांधून रक्षाबंधनाचा अनोखा सोहळा साजरा केला.**



गोरक्षनाथ टेकडी येथे काल्याचे कीर्तन झाल्यानंतर संजय महाराज पाचपोर यांनी घाटसावळी येथील लोकनेते गोपीनाथ मुंडे वृद्धाश्रमाला भेट दिली. यावेळी त्यांनी वृद्धाश्रमातील वयोवृद्ध नागरिकांशी संवाद साधत त्यांची आपुलकीने विचारपूस केली. उपस्थित माता-माऊलींनी पाचपोर महाराजांना राखी बांधून स्नेहबंध दृढ केला. यावेळी त्यांनी व्यसनमुक्ती केंद्रातील रुग्णांशीही संवाद साधला. व्यसनामुळे केवळ एका व्यक्तीचे नव्हे, तर संपूर्ण कुटुंबाचे आणि अनेक पिढ्यांचे नुकसान होते. त्यामुळे व्यसनापासून दूर राहून नवीन जीवनाचा संकल्प करावा, असे आवाहन पाचपोर महाराजांनी केले. पाचपोर महाराजांनी वृद्धाश्रमातील कामकाजाची पाहणी केली. समाजोपयोगी कार्य अत्यंत प्रामाणिकपणे राबविणाऱ्या संस्थेचे सर्वेसर्वा शिवाजीराव फड, संचालक चंद्रकांत फड व त्यांच्या कुटुंबीयांच्या कार्याचे त्यांनी कौतुक केले. सामाजिक जाणीवेतून उभारण्यात आलेला स्वच्छ आणि सुंदर आश्रम पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. वयोवृद्धांची प्रामाणिकपणे सेवा केल्यास समाजकार्य करताना कोणतीही कमतरता भासत नाही, असेही ते यावेळी म्हणाले. या प्रसंगी श्री ह. भ. प. प्रा. डॉ. नाना महाराज कदम, हरिदास (भाऊ) जोगदंड, श्री ह. भ. प. सुरेश महाराज जाधव, गणेश महाराज बांडे, सोमनाथ माने, बंकटराव माने, कृ उ बा स संचालक नितीन फड, पांडुरंग महाराज शिंदे, माऊली दराडे आदी उपस्थित होते. वयोवृद्ध माता-माऊलींनी संजय महाराज पाचपोर यांना राखी बांधल्याने वृद्धाश्रमात आपुलकी, प्रेम आणि कृतज्ञतेचा अनोखा सोहळा अनुभवायला मिळाला. या कार्यक्रमाचे नियोजन अजिनाथ शेरकर, गायकवाड, नेहरकर, योगेश कुलकर्णी, सहदेव फड, बाबू फड यांनी केले.

# ओबीसी आरक्षण बचावसाठी कीर्तने यांचे आमरण उपोषण




**मराठा समाज इडब्ल्यूएस इसीबीसी आणि आता ओबीसी मधून बॅक डोअर खोटी कुणबी प्रमाणपत्र काढून मूळ ओबीसीच्या आरक्षणावर गदा आणत आहे भारतीय राज्यघटनेच्या संविधानानुसार एकाच मराठा जातीला तीन-तीन आरक्षणाचा शैक्षणिक सामाजिक व राजकीय लाभ होत असल्याने ओबीसी यांचे राजकीय सामाजिक शैक्षणिक अस्तित्व संपल्यात जमा असल्याने शासनाने २ सप्टेंबर २०२५ चा शासन निर्णय रद्द करून खोटी कुणबी प्रमाणपत्र देणे थांबवावे व मूळ २७% ओबीसींचे आरक्षण अबाधित ठेवावे अन्यथा भगवानगडाच्या पायथ्याला विद्रोही आंदोलन पाहायला मिळेल**

**- लहू दराडे.**


**पाथर्डी । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात ओबीसी विरुद्ध मराठा असा आरक्षणाचा वाद गेल्या तीन वर्षापासून पेटलेला असताना पुन्हा एकदा आरक्षणाच्या मुद्द्यावरून मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण दिल्याने ओबीसी प्रवर्गातून मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र व आरक्षण देऊ नये खोटी तसेच खाडाखोड बनावट कुणबी प्रमाणपत्र बेकायदेशीर देणाऱ्या अधिकाऱ्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत ओबीसींचे मूळ २७% आरक्षणावर गदा येऊ नये तसेच मागील वर्षी २ सप्टेंबर २०२५ चा घटनाबाह्य शासन निर्णय रद्द करावा व ओबीसी चे हक्क न्याय आणि मूळ आरक्षण अबाधित राहावे या मागण्यासाठी कीर्तनवाडी येथील ओबीसी आंदोलक प्रल्हाद कीर्तने यांनी शनिवारपासून कीर्तनवाडी येथील मारुती मंदिरासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे प्रल्हाद कीर्तने यांनी यापूर्वीही ओबीसी आरक्षण बचाव मोहिमेसाठी व ओबीसींचे न्याय हक्क व घटनात्मक अधिकार सुरक्षित रहावे यासाठी चार वेळा आमरण उपोषण केलं असून त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व ओबीसी नेते छगन भुजबळ धनंजय मुंडे पंकजा मुंडे गोपीचंद पडळकर महादेव जानकर विजय वडेट्टीवार लक्ष्मण हाके एड.मंगेश ससाने नवनाथ वाघमारे यांना भगवानगड परिसराच्या पायथ्याशी असणाऱ्या कीर्तनवाडी येथे आमंत्रित केले आहे प्रल्हाद कीर्तने यांच्या उपोषण स्थळी भगवानगड परिसरातील अनेक गावातून ओबीसी आंदोलक समर्थन देत आहेत यावेळी ज्येष्ठ कार्यकर्ते लहू दराडे भास्कर कीर्तने भागवत कीर्तने लक्ष्मण कीर्तने अजिनाथ कीर्तने किरण कीर्तने तसेच अनेक समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लाडक्या बहीणींची पुन्हा एकदा फसवणूक-जितेंद्र आव्हाड

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील लाडकी बहीण योजनेतून ९२ लाखांहून अधिक लाडक्या बहिणींची नावे वगळण्यात आली आहेत. केवायसीसह विविध कारणांस्तव या लाडक्या बहिणींना योजनेतून वगळण्यात आल्याने त्यांना दरमहा मिळणारा दीड हजार रुपयांचा हफ्ता बंद झाला आहे. या निर्णयामुळे लाडक्या बहिणींमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त होत असून, विरोधकांकडून सरकारवर टीकाही केली जात आहे. पुन्हा एकदा लाडक्या बहिणींना सरकारने फसवल्याचे राष्ट्रवादी (शप) चे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी म्हटले आहे.**



आव्हाड म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची आमची कोअर कमिटी बैठक झाली. राज्यातील आणि देशातील प्रश्नांवर या बैठकीत चर्चा झाली. महागाई वाढत आहे, पण याबाबत सरकार गंभीर नाही, याबाबत आमची चर्चा झाली. कर्जमाफी केल्याचे गवगवा करत आहेत. मात्र, प्रत्यक्षात परिस्थिती वेगळी आहे. तसेच, लाडकी बहीण योजनेंअंतर्गत १ कोटी महिलांची नावे कमी केली आहेत. सरकारने या महिलांची फसवणूक यांनी केली आहे, असे म्हणत त्यांनी सरकारवर टीका केली. तसेच, पेपर फुटीबाबत सरकार गंभीर नाही. आम्ही एमपीएससी पेपरफुटीबाबत आंदोलन करणार आहोत, देशात आणि महाराष्ट्रात बेरोजगारी वाढत आहे. हाताला काम देणारे राज्य म्हणून महाराष्ट्राच नाव होते. आता, हातातून काम काढून घेणारे राज्य अशी आपली ओळख होते आहे. मध्ये रेशनकार्डला मान्यता मिळत नाही. फॉर्म नंबर ७ चा वापर करून अनेक नावे कमी केली जातील, असेही आव्हाड म्हणाले.

# महावितरणच्या तारा, शेतकऱ्यांच्या मोटारी, केबल व सोलार चोरी करणारी टोळी जेरबंद

### ८ लाखांचा मुद्देमाल जप्त; १३ गुन्हे उघड, सहा आरोपी अटकेत

**जालना । प्रतिनिधी**

मागील काही दिवसात पोल वरील जर्मन तार चोरीच्या घटना काजळा, पानखेडा, ढोकसाळ रोषणगांव, हलदोला, बदनापुर या ठिकाणी घडलेल्या होत्या तसेच कडेगाव शिवार, वाघ्रळ दाभाडी, डोंगरागव, चनेगाव शिवारात वायर, पाण्याच्या मोटारीच्या चोरीच्या घटना घडल्या होत्या त्यामुळे शेतकरी मोठ्या चिंतेत होते. सदरच्या घटना रोखण्यासाठी आरोपींना अटक करणे गरजेचे असुन ते बदनापुर पोलीसांसमोर एक अहवान होते. या आरोपींचा शोध घेण्यासाठी ३ तपास पथकांची स्थापना केली होती. मागील १५ दिवसांपासुन पोलीस स्टेशन बदनापुर येथील या तपास पथकांनी परिश्रम घेवुन तांत्रीक तपासाच्या आधारे गुन्हयाचा छडा लावुन तब्बल १३ गुन्हे उघडकीस आणलेले असुन जप्त मुद्देमाल ८,१४,०००/- रु व दोन



पीकअप वाहन किंमत १२,००,००० रु असा एकुण २०,१४,०००/- रु चा मुद्देमाल जप्त केला आहे. सध्या सदर गुन्हयात एकुण ६ आरोपी १) दिलीप गणेश शिंदे रा. फुलेनगर बदनापुर ता. बदनापुर २) विकास भाउसाहेब मांदळे रा. मातोश्री नगर रेल्वेस्टेशन बदनापुर ता. बदनापुर ३) विजय बाबुराव पाखरे रा. साठेनगर अंबड ता. अंबड ४) संतोष तुकाराम पवार रा. शेवगा ता. अंबड ५) अभिजीत विष्णु गारोळे रा. नेहरु नगर परभणी ता. जि. परभणी हे आरोपी व १) युसुफखान हनीफखान रा. काबरानगर गारखेडा परिसर छ. संभाजीनगर जि.छ. संभाजीनगर २) अब्दुल माजीद अब्दुल कदिर रा. बदनापुर ३) चांद मीर बागवान रा. दाभाडी यांच्या वर कारवाई करण्यात आली असून अटक आरोपी यांना सध्या ५ दिवस मिळाला आहे.

सदर कारवाईमुळे शेतक-यांच्या शेतातील विद्युत तार व मोटार केबल चोरीच्या घटनांना आळा बसण्यास मदत होणार असुन चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत करण्यात बदनापुर पोलीसांना यश आले आहे. सदरची कारवाई मा.श्री. तेघबिर सिंह संधु पोलीस अधिक्षक , मा. विक्रम साळी अप्पर पोलीस अधिक्षक , मा. अनंत कुलकर्णी उपविभागीय पोलीस अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक एम.टी. सुरवसे, पोउपनि श्री कुकलारे, स. फौजदार श्री. इस्माईल शेख, पोहेकों/६७१ अंकुश दासर, पोहेकॉ / १३५१ रंजीत मोरे, पोकों/१६९९ एस.जे. तडवी, पोकॉ/ ३४२ पी. के. गोलवाल, पोकों/४९४ परमेश्वर ढगे, पोकों/२२७ भडांगे, पोकॉ/ ११ रतन गोरे, पोकों/५७ देहंगळ, पोकॉ/ ८८७ आर.डी. सानप यांनी केली आहे.

## पान १ वरून...

### ऊसतोडीसाठी पैसे

तक्रार प्राप्त झाल्यास संबंधित कारखान्याने तिचे सात दिवसांच्या आत निवारण करावे, असे निर्देश देण्यात आले आहेत. तक्रारीत तथ्य आढळून आल्यास शेतकऱ्याकडून वसूल केलेली रक्कम संबंधित ऊसतोड मजूर, मुकादम किंवा वाहतूक कंत्राटदाराच्या बिलातून वसूल करून ती संबंधित शेतकऱ्याला अदा करावी, असेही परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, २०२६-२७ गाळप हंगामात आपला ऊस गाळप होईल की नाही, या शंकेपोटी शेतकऱ्यांनी ऊस लवकर गाळपासाठी पाठविण्याची घाई करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रादेशिक सहसंचालक (साखर) तसेच साखर आयुक्त कार्यालयाच्या स्तरावर ऊस गाळपाचा नियमित आढावा घेतला जाणार आहे. राज्यातील कोणत्याही ऊस उत्पादक शेतकऱ्याचा ऊस शिल्लक राहणार नाही, यासाठी नियोजन करण्यात येत असल्याचे साखर आयुक्तांनी स्पष्ट केले आहे.

------------

### 'तुम्ही स्वतःला देव

मात्र, परवाने एमसीएच्या नावावर असताना ही रेस्टॉरंट शिर्के इन्फ्रास्ट्रक्चर कडून चालवली जात असल्याचे कारण देत एफडीएने निलंबन कायम ठेवले होते. यावर न्यायालयाने एफडीएने कायद्याचा व्यावहारिक विचार न करता केवळ तांत्रिक दृष्टिकोन स्वीकारल्याचे नमूद केले. अशा प्रकारच्या व्यवस्थेला कायद्यात स्पष्ट बंदीची तरतूद नसल्याचेही खंडपीठाने सांगितले. मागील सुनावणीवेळी एफडीएला व्यावहारिक दृष्टिकोन स्वीकारण्याचे निर्देश दिले होते. तरीही विभागाने त्याचा विचार केला नाही, अशी नाराजी न्यायालयाने व्यक्त केली. संबंधित अधिकाऱ्यांविरोधात अवमान कारवाई करण्याचा इशारा देत न्यायालयाने, "आम्ही अधिकाऱ्यांना वारंवार फटकारून थकलो आहोत. आता कठोर आदेश देण्याची वेळ आली आहे. आम्ही अवमान कारवाई करू," असे सुनावले. एफडीएकडून वारंवार घाईघाईने निर्णय घेतले जात असल्याबद्दलही न्यायालयाने प्रश्न उपस्थित केला. "तुम्ही स्वतःला देव समजता का आणि काहीही करू शकता असे वाटते का?" असा सवाल न्यायालयाने केला. दरम्यान, न्यायालयाच्या नाराजीनंतर अतिरिक्त सरकारी वकील पी. पी. काकडे यांनी एफडीए निलंबनाचा आदेश मागे घेणार असल्याचे सांगितले. तसेच एमसीएला शिर्के इन्फ्रास्ट्रक्चर सोबतच्या कराराबाबत नव्याने नोटीस देऊन त्याची बाजू ऐकून घेतल्यानंतर कारणांसह निर्णय घेतला जाईल, असे स्पष्ट केले. रेस्टॉरंट आता नियमांचे पालन करत असल्याने निलंबनाचा आदेश उठवण्यात येत असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. त्यानंतर पाचही रेस्टॉरंटना सेवा पुन्हा सुरू करण्याची परवानगी देत न्यायालयाने याचिका निकाली काढल्या. दरम्यान, तृतीय पक्षाकडून रेस्टॉरंट चालविण्याशी संबंधित मुद्द्यांचा एफडहीए स्वतंत्रपणे पुनर्विचार करणार आहे.

------------

### हे शेवटचं आंदोलन;

परवडणार नाही. त्यामुळे पक्की तयारी करायची आहे. येत्या १२ तारखेला मुंबईच्या तारखेची घोषणा करू, मुंबईत ५ टप्प्यात आंदोलन होईल अशी माहिती मनोज जरांगे पाटील यांनी दिली. मी काय चीज आहे, हे अजित दादा, फडणवीस आणि एकनाथ शिंदेंना माहिती आहे, मी साधं रसायन नाही, त्यांच्यात चर्चा होती. त्यामुळे, ही लढाई आपल्याला नियोजनबद्ध करावी लागणार आहे. फडणवीस-शिंदेंच्या डोक्याला मुंग्या आल्या पाहिजेत. सरकारला माज आलाय, आमचे कोणीच काही करू शकत नाही असं त्यांना वाटतंय. पण, मराठ्यापुढे सत्तेच शहाणपण चालत नाही. एकदा प्लॅनिंग झाली तर मुंबईच नाही दिल्ली सुद्धा हलवू शकतो, अशा शब्दात जरांगे पाटलांनी सरकारला इशारा दिला आहे. मला बोलता आले नाही तरी मला वर्षावर घेऊन जा, मी बारका दिसतो पण १०-१२ जण पाडू शकतो. मुंबईला ४०-४५ लाख मोटरसायकल काढायच्या आहेत, मी एकटा ट्रकवर येतो, असेही जरांगे पाटील यांनी म्हटले. मनोज जरांगे यांनी साठीतील मराठा समाज बांधवांना देखील आवाहन केले आहे. म्हातारे माणसे जे ५०-६० च्या आतचे आहेत, त्यांनी मुंबईला चला. तरुण झुंजणार तर मग म्हातारे नोकरी करणार का? पारावर वेळ घालवण्यापेक्षा, समाजासाठी लढा, असे जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.

**१२ तारखेला मुंबईची तारीख ठरणार**

इथे कोणताच समाज सुखी नाही. मुंबईतील ना मराठी माणूस सुखी आहे, ना परप्रांतीय, मराठवाडी आणि जैनसुद्धा सुखी नाही. डी.बी. पाटलांचे नाव सुद्धा विमानतळाला द्यायला हे तयार नाहीत, यांना माज आलाय. १२ तारखेला जी तारीख ठरेल त्याची तयारी करावी. मुंबईतील मराठ्यांनी फक्त जेवण कमी पडू देऊ नये, असे म्हणत पुन्हा एकदा मुंबईला जायची तयारी सुरू असल्याचे जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.

----------------

### सोनिया गांधींच्या आत्मचरित्रावरून काँग्रेस

नकार दिल्यानंतर कंपनीने भारतात पुस्तक प्रकाशित करण्यास नकार दिल्याचा दावा गेहलोत यांनी केला. हा प्रकार अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर हल्ला असल्याची टीकाही त्यांनी केली. गेहलोत यांच्यासह काँग्रेसच्या अनेक नेत्यांनी पेंग्विनच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केली आहे. हे पुस्तक जगातील इतर देशांमध्ये पेंग्विनच्या प्रकाशन संस्थेमार्फत प्रकाशित होत असेल, तर केवळ भारतात त्याचे प्रकाशन का थांबविण्यात आले, असा सवाल काँग्रेस नेत्यांनी उपस्थित केला आहे. काँग्रेसचे नेते कमलनाथ यांनीही या प्रकरणावरून प्रश्न उपस्थित केला. सोनिया गांधी यांच्यासारख्या वरिष्ठ नेत्याला आता काय लिहावे आणि काय लिहू नये, हे प्रकाशक ठरविणार का, असा सवाल त्यांनी केला. प्रकाशकानेच आपल्यावर दबाव असल्याचे सांगितल्याचा दावाही काँग्रेस नेत्यांकडून करण्यात आला आहे. मात्र, सरकारकडून पेंग्विन रँडम हाऊसवर प्रत्यक्ष दबाव आणण्यात आला होता, या काँग्रेस नेत्यांच्या आरोपाची अद्याप स्वतंत्र पुष्टी झालेली नाही. त्यामुळे या प्रकरणातील नेमके तथ्य काय, याबाबत संभ्रम कायम आहे. सोनिया गांधी यांच्या 'बिलाँगिंग : अ जर्नी ऑफ लव्ह' या पुस्तकाचे भारतातील प्रकाशन आणि वितरण नेमके कोणामार्फत होणार, याबाबत अद्याप स्पष्टता आलेली नाही. दरम्यान, अमेझॉनवर या पुस्तकाची इलेक्ट्रॉनिक आवृत्ती २ हजार ६१५ रुपयांना आगाऊ नोंदणीसाठी उपलब्ध असल्याचे दिसून येत आहे. अमेझॉनवरील माहितीनुसार, या इलेक्ट्रॉनिक पुस्तकाचे प्रकाशन हार्परकॉलिन्स यूकेच्या विल्यम कॉलिन्स या प्रकाशन संस्थेमार्फत करण्यात आले आहे. त्यामुळे भारतात पुस्तकाची छापील आवृत्ती कोण प्रकाशित करणार आणि त्याचे वितरण कशा पद्धतीने होणार, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. प्रकाशनाआधीच राजकीय आरोप-प्रत्यारोपांना सुरुवात झाल्याने सोनिया गांधी यांच्या आत्मचरित्राची चर्चा आता पुस्तकातील मजकुरापेक्षा त्याच्या भारतातील प्रकाशनाभोवती अधिक रंगू लागली आहे.

----------------

### नेपाळ महाप्रलय : मृतांचा आकडा ६००

बचावकार्यात अडथळा येत असल्याचे आपत्कालीन पथकांचे म्हणणे आहे. चीनकडील बाजूस ७ लोकांचा मृत्यू झाला आहे. पूरग्रस्त बाधित भागात या आठवड्याच्या अखेरीस आणखी पावसाची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर अधिकारी दोन जलाशयांतील पाणी पातळीकडे बारकाईने लक्ष ठेवून आहेत. कारण यामुळे पूरस्थिती निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. चीनच्या सरकारी प्रसारमाध्यमाच्या वृत्तानुसार, पुरामुळे मोठे नुकसान झालेल्या एका सीमावर्ती भागात कोणीही जिवंत आढळून आलेले नाही. तर नेपाळ पर्यटन मंडळाने, पूरस्थिती अडकलेल्या आतापर्यंत १८४ परदेशी नागरिकांची सुटका केली असल्याची माहिती दिली आहे. तिबेटमधील सात जणांचा मृत्यू झाला असून ५५४ जण बेपत्ता आहेत. गेल्या बुधवारी नेपाळ-तिबेट सीमेवर अचानक आलेल्या भयंकर पुरामुळे घरे, वाहने, रस्ते आणि पूल वाहून गेले आहेत. तसेच जलविद्युत प्रकल्पांचे मोठे नुकसान झाले आहे. नेपाळमधील पुरानंतर भोटेकोशी नदीतून चितवन जिल्ह्यात २२९ बेवारस आणि अद्याप ओळख न पटलेले मृतदेह वाहून आले आहेत. ते दफन करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.

----------------

### मराठा आरक्षण आंदोलनासाठी

सुरू केले आहे. त्यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी सुग्रीव शिंदे हे आपल्या सहकाऱ्यांसह सराटी आंतरवालीकडे निघाले होते. त्यांचे वाहन गेवराई परिसरात आले असताना शिंदे यांना अचानक हृदयविकाराचा तीव्र धक्का आला. त्यातच त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती नातेवाईकांनी दिली. या घटनेमुळे नांदुर घाट परिसरासह मराठा आरक्षण आंदोलनातील कार्यकर्त्यांमध्ये शोककळा पसरली आहे.

------------

### देशाची शिक्षण व्यवस्था पूर्णपणे उद्ध्वस्त';

कारण शोधण्यासाठी तपास सुरू आहे. या घटनेवर प्रतिक्रिया देताना अभिजीत दीपके म्हणाले की, आयआयटी सारख्या संस्थांची गणना देशातील सर्वोत्तम शैक्षणिक संस्थांमध्ये होते. मात्र, गेल्या वर्षभरात आयआयटी संस्थांमध्ये ६५ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याचा दावा त्यांनी केला. "ही आपल्या देशातील सर्वोत्तम शैक्षणिक संस्थांची अवस्था आहे," असे ते म्हणाले. विद्यार्थ्यांच्या मनात भविष्याबाबत मोठी भीती निर्माण झाली असून ती दूर करण्यासाठी शैक्षणिक संस्थांमध्ये सुरक्षित आणि आधार देणारे वातावरण निर्माण करण्याची गरज असल्याचे दीपके यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना एकटे आणि अलिप्त न ठेवता त्यांच्या समस्या वेळीच ओळखून त्यावर योग्य उपाय करणे आवश्यक आहे. मात्र, अनेकदा विद्यार्थ्यांना त्यांच्या संघर्षाशी एकट्याने सामना करण्यासाठी सोडले जाते, अशी टीकाही त्यांनी केली. दरम्यान, ऋषिकेश कुमार यांच्या मृत्यूची चौकशी करण्यासाठी आयआयटी दिल्लीने बाह्य चौकशी समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. या समितीत दिल्ली उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीश न्यायमूर्ती मुक्ता गुप्ता आणि एम्सचे प्राध्यापक प्रताप शरण यांचा समावेश आहे. आयआयटी दिल्लीचे रजिस्ट्रार तसेच विद्यार्थ्यांचे चार प्रतिनिधीही समितीचे सदस्य असतील. यावेळी अभिजीत दीपके यांनी उद्योगपती सुभाष चंद्रा यांच्यावरही निशाणा साधला. "त्यांचे २२ हजार कोटी रुपयांचे कर्ज सेटल करून ६ कोटी रुपयांवर आणण्यात आले. अशी सवलत सामान्य व्यक्तीला मिळू शकते का?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

--------------------

### पेट्रोलमध्ये इथेनॉल

देखभाल खर्चावर काय परिणाम होतो, याचा अभ्यास करण्यासाठी स्वतंत्र तज्ज्ञ समिती स्थापन करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. या समितीने वाहनांची सुसंगतता, इंजिनचं आयुष्य, देखभाल खर्च, पर्यावरणीय परिणाम, इथेनॉल उत्पादनासाठी लागणारा पाणीवापर आणि अन्नसुरक्षेवरील परिणामांचा अभ्यास करावा, असे याचिकेत म्हटले आहे. दरम्यान, या मागण्यांसाठी याचिकाकर्त्यांनी ४ जुलै २०२६ रोजी केंद्र सरकारच्या पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयासह संबंधित विभागांकडे निवेदन दिल्याचं याचिकेत नमूद आहे. मात्र समाधानकारक प्रतिसाद न मिळाल्याने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार, दि. ३० ऑगस्ट २०२६
३

## थोडक्यात

### बहिण-भावाच्या पवित्र नात्याचा सण रक्षाबंधन उत्साहात

युसूफवडगांव/प्रतिनिधी :- बहिण-भावाच्या अतूट प्रेमाचे, जिव्हाळ्याचे आणि विश्वासाचे प्रतीक असलेला रक्षाबंधनाचा सण युसूफवडगावसह परिसरात मोठ्या उत्साहात व आनंदात साजरा करण्यात आला. रक्षाबंधनानिमित्त बहिणींनी भावांच्या मनगटावर राखी बांधून त्यांच्या दीर्घायुष्याची व सुखी जीवनाची कामना केली, तर भावांनी बहिणींना भेटवस्तू देत सदैव तिच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा शब्द दिला.



रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर गेल्या काही दिवसांपासूनच बाजारपेठेत विविध रंगांच्या, आकर्षक व फॅन्सी राख्यांची रेलचेल पाहायला मिळत होती. राख्या, मिठाई, कपडे तसेच विविध भेटवस्तूंच्या खरेदीसाठी नागरिकांची गर्दी झाली होती. सणाच्या दिवशी सकाळपासूनच घराघरांत बहिणींनी भावांचे औक्षण करून राखी बांधली. काही बहिणींनी आपल्या भावांच्या घरी जाऊन, तर काही भावांनी बहिणींना घरी बोलावून रक्षाबंधनाचा सोहळा साजरा केला.

रक्षाबंधन म्हणजे केवळ मनगटावर बांधली जाणारी राखी नव्हे, तर आयुष्यभर एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होण्याची आणि नात्यातील प्रेम व विश्वास अधिक घट्ट करण्याची भावना आहे. त्यामुळे युसूफवडगाव परिसरात रक्षाबंधनाचा सण आनंदी आणि उत्साही वातावरणात साजरा झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

### सेवानिवृत्त शिक्षक विठ्ठलराव जाधव यांच्या सहस्त्र चंद्र दर्शन सोहळ्यानिमीत्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

माजलगाव । प्रतिनिधी

येथील श्री सिध्देश्वर माध्यमिक विद्यालयाचे सेवानिवृत्त शिक्षक



विठ्ठलराव साहेबराव जाधव यांच्या ८१ व्या वाढदिवसाच्या तथा सहस्त्र चंद्र दर्शन सोहळ्यानिमीत्त श्री सिध्देश्वर माध्यमिक विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप, मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर, उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर , पर्यवेक्षक कमलाकर झोडगे सर, परमेश्वर आदमाने सर इत्यादी उपस्थित होते. यावेळी माता सरस्वती चे पूजन करण्यात आले. यावेळी सर्व मान्यवरांच्या हस्ते राखी प्रदर्नीचे उदघाटन करण्यात आले. यावेळी जाधव गुरुजींचे कुटुंबीय अविनाश जाधव सर, प्रा विकास जाधव सर, विनोद जाधव, कन्या सौ विजया शेजुळ (जाधव) , नात कु. अनुष्का, कु. अनुजा इत्यादी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप प्रशांत भानप यांनी केले, प्रास्ताविक कु अनुजा जाधव यांनी केले आभार रोहित खिंडरे यांनी मानले तर सुत्रसंचालन कमलाकर झोडगे सर यांनी केले.

# दुष्काळी परिस्थितीमुळे लोकलढा पाणी आंदोलन पेटले

## सिंचनासाठी साडेसहा हजार कोटी दिले, ही शेतकऱ्यांची फसवणूक; शेतीला हक्काचे पाणी द्या, पौळाच्यावाडीत एकमुखी मागणी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा व माजलगाव तालुक्यातील शेती सिंचनासाठी मंत्रीमंडळाने साडेसहा हजार कोटी रुपये मंजूर केले, बीड जिल्ह्यात सत्तर हजार हेक्टर शेती सिंचनाखाली येईल अशा लोणकढी थापा शेतकर्यांना दिल्या जात आहेत, मात्र वास्तव वेगळे आहे, साडेसहा हजार कोटीतून अशा गोष्टी होणार नाहीत, ही शेतकऱ्यांची फसवणूक असल्याची प्रखर टीका लोकलढा पाणी आंदोलनचे समन्वयक दिनेश गुळवे यांनी केली, ते ते गेवराई तालुक्यातील पौळाचीवाडी येथे पाणी जागर बैठकीत बोलत होते. शेतकऱ्यांना जायकवाडी धरणातून हक्काचे पाणी द्या, अशी एकमुखी मागणी यावेळी शेतकऱ्यांनी केली. सध्या तीव्र दुष्काळी परिस्थिती असल्याने लोकलढा पाणी आंदोलन पेटले असून त्याची धग शेतकऱ्यांमध्ये दिसून येत आहे.



यावेळी लोकलढा आंदोलनाचे समन्वयक राहुल लोंढे, भरत पवार, गोपाल आहेर, लिंबाजी मुळे महाराज, सचिन लुंकड,भारत सोळंके, ज्ञानेश्वर मैंद, गोरख साळुंके, देविदास करांडे यांच्यासह शेतकरी, महिला, तरुण आदींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. गोदावरी भरुन वाहत असली तरी सिंदफणा, अमृता, डोंबरी, बिंदुसरा या नद्यांसह ओढे कोरडेठाक पडले आहेत. पाऊस नसल्याने विहिरींना पाणी वाढले नाही, त्यामुळे पिकांना पाणी देता येत नाही, परिणामी लोखो हेक्टर वरील पिके वाळून चालली आहेत. अशा परिस्थितीत गोदावरी-सिंदफणा नदीजोड प्रकल्पाची आवश्यकता भासते. बीड जिल्ह्यात नदीजोड प्रकल्प केल्यास सर्व शेती पाण्याखाली येईल, नदीजोड प्रकल्प व उपकालवा केल्यास शेतकऱ्यांवरील संकट दूर होईल, त्यामुळे शासनाने तातडीने हा प्रकल्प करावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. गेल्या मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत सिंचनासाठी सहा हजार चारशे सत्याहत्तर कोटी मंजूर केल्याच्या बातम्या आल्या, हा निधी बीड जिल्ह्यातील शेतीला मिळणार अशी शेतकऱ्यांची भावना झाली आहे, मात्र वस्तुस्थिती वेगळी आहे. साडेसहा हजार कोटी निधीतील अडीच हजार कोटी अगोदरच खर्च झाले आहेत, यातील दोन हजार कोटी रुपये भूसंपादनासाठी आहेत तर साळिंबा प्रकल्पासाठी ३३० कोटी, सिरसमार्ग येथे पुलासाठी सात कोटी व अन्य एका पुलासाठी चार कोटींचा निधी मिळणार आहे. या निधीतून साळिंबा प्रकल्पातून पाच हजार हेक्टर सिंचन होणार आहे, सत्तर हजार हेक्टर सिंचन होईल, ही भूलथाप असल्याची टीका यावेळी दिनेश गुळवे यांनी केली. विदर्भात ९४ हजार कोटींचा प्रकल्प होत आहे, तेव्हा गोदावरी-सिंदफणा नदीजोड प्रकल्प व श्री क्षेत्र भगवान गड ते माजलगाव पर्यंतच्या सर्व शेतीला पाणी मिळेल अशी योजना करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली. शेतीला पाणी नसल्याने शेतकरी आत्महत्या, बेरोजगारी, स्थलांतर असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत, हे सोडवण्यासाठी व शेतीला हक्काचे पाणी मिळावे यासाठी तीव्र लढा देण्याचा निर्धार यावेळी शेतकरी ग्रामस्थांनी केला.

**सातत्याने शेती तोट्यात**

या बैठकीत बोलताना सचिन लुंकड म्हणाले, की पावसाची अनियमितता व शेतीला पाणी नसल्याने शेती सातत्याने तोट्यात जात आहे. यातून तरुणांमध्ये नैराश्य येत आहे. हाताला काम व रोजगार नसल्याने तरुणांचे मोठ्या प्रमाणावर पुणे, मुंबई अशा भागात स्थलांतर होत असल्याचे लुंकड म्हणाले.

**नकाशाद्वारे शेतकरी जागृती**

आपल्या शेतीला हक्काचे पाणी कसे मिळणार, श्री क्षेत्र भगवान गड ते माजलगाव पर्यंतची वंचित भागातील शेती पाण्याखाली येईल का नाही, असा प्रश्न शेतकऱ्यांना आहे. या संपूर्ण शेतीला पाणी कसे मिळेल व योजना कशी करावी लागेल हे लोकलढा आंदोलनचे समन्वयक राहुल लोंढे यांनी नकाशाद्वारे स्पष्ट केले.

# रक्षाबंधनाच्या पवित्र पर्वावर जपला आपुलकीचा स्नेहबंध

आष्टी । प्रतिनिधी

रक्षाबंधनाच्या पवित्र पर्वानिमित्त आष्टी विधानसभेचे भाजप आमदार सुरेश धस यांच्या अद्वैतचंद्र निवासस्थानी यंदाही रक्षाबंधनाचा सण आपुलकी, प्रेम आणि स्नेहाच्या वातावरणात साजरा करण्यात आला.

सालाबादप्रमाणे यंदाही गोरगरीब, वंचित तसेच भटक्या-विमुक्त समाजातील असंख्य भगिनींनी आमदार सुरेश धस यांच्या मनगटावर राखी बांधून रक्षाबंधनाचा सण उत्साहात साजरा केला. भगिनींनी व्यक्त केलेल्या प्रेमाचा आणि जिव्हाळ्याचा सन्मान म्हणून प्रत्येक भगिनीला साडी-चोळी व फळे देऊन आदरपूर्वक सन्मान करण्यात आला.



**गोरगरीब, वंचित व भटक्या-विमुक्त भगिनींसोबत आ. सुरेश धस यांनी साजरा केला रक्षाबंधनाचा सण**

रक्षाबंधनाच्या निमित्ताने केवळ राखीचा धागा बांधला गेला नाही, तर समाजातील वंचित घटकांशी असलेला आपुलकीचा आणि माणुसकीचा स्नेहबंध अधिक दृढ करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

भगिनींच्या चेहऱ्यावर दिसणारे समाधान, आनंद आणि प्रेम हेच या रक्षाबंधन सोहळ्याचे खरे वैशिष्ट्य ठरले. राखीच्या या पवित्र धाग्याने जपलेला स्नेहबंध सदैव दृढ राहावा आणि प्रत्येक भगिनीच्या आयुष्यात सुख, समाधान, आनंद व समृद्धी नांदावी, अशी मनःपूर्वक सदिच्छा आमदार सुरेश धस यांनी व्यक्त केली.

रक्षाबंधन हा केवळ भाऊ-बहिणीच्या नात्याचा सण नसून प्रेम, विश्वास, आपुलकी आणि सामाजिक बांधिलकी जपणारा सण आहे. माझ्या सर्व भगिनींचे प्रेम आणि आशीर्वाद हीच माझी खरी ताकद आहे, अशी भावना आ. सुरेश धस यांनी व्यक्त केली.

यावेळी अद्वैतचंद्र निवासस्थानी रक्षाबंधनासाठी आलेल्या भगिनींमध्ये आनंदाचे आणि भावनिक वातावरण पाहायला मिळाले. सर्व भगिनींना आमदार सुरेश धस यांच्याकडून रक्षाबंधनाच्या हार्दिक शुभेच्छा!

## पान ६ वरुन...

### राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात

जीवनातून प्रेरणा घेऊन राष्ट्रप्रेमाने खेळण्याचे आवाहन केले. सत्कारमूर्ती कविता गित्ते यांनी या यशात जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाचे मोठे योगदान असल्याचे सांगितले. या कार्यक्रमास जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, संस्थेचे अध्यक्ष इंजि. बलभीमराव जाहेर पाटील, सचिव प्रा. जे. पी. शेळके, जेष्ठ क्रीडा संघटक प्रा. दिनकर थोरात, डॉ. अविनाश बारगजे, प्रा. शिवाजीराव जगताप यांसह क्रीडा क्षेत्रातील विविध मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शज्ञानेश्वर कोटुळे यांनी केले तर आभार श्री. एस. सी. जगताप यांनी मानले.

### कारची काच फोडून

अज्ञात इसमांनी कारची काच फोडून पैशांची पिशवी पळवून नेल्याचे स्पष्ट झाले. यात कारचे अंदाजे दहा हजारांचे नुकसानही झाले आहे. फिर्यादीच्या तक्रारीवरून अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात दोन अनोळखी इसमांविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३(२) आणि ३२४(१) अन्वये गुन्हा नोंदवला गेला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार पिराजी व्यंकट गुट्टे करत आहेत.

### रक्षाबंधनानिमित्त जागर

झाला, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. या कार्यक्रमाला जागर प्रतिष्ठानचे अध्यक्ष किसन पाटील चव्हाण, डॉ. जनक चौरे, सरपंच मोमिन,ग्रामसेवक भागवत भुजबळ,विशाल जाधव,पत्रकार प्रकाश यादव,पप्पू मुंडे, गावातील सर्व आशा सेविका ,अंगणवाडी सेविका व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

### अक्षय मुंदडा यांच्या

संबोधित करताना प्रमुख पाहुण्यांनी सांगितले की, ''गावातील मूलभूत सुविधा, रस्ते, पाणी आणि सार्वजनिक वास्तूंची कामे वेळेत पूर्ण करण्यावर भर दिला जात आहे. परिसराच्या विकासासाठी निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही.'' या कार्यक्रमात परिसरातील नागरिक व कार्यकर्त्यांनी विविध समस्या आणि मागण्या मांडल्या, त्यावर सकारात्मक मार्ग काढण्याचे आश्वासनही यावेळी देण्यात आले. या सोहळ्यास परिसरातील ज्येष्ठ नागरिक, तरुण, स्थानिक लोकप्रतिनिधी, विविध संस्थांचे पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्थानिक कार्यकर्त्यांनी व ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटी आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

### पाटोद्यात सोन्याच्या दुकानावर

साधून त्यांच्या अंगावरील ७ तोळे सोन्याचे दागिने हातोहात लांबवले. भरदुपारी आणि गर्दीच्या ठिकाणी घडलेल्या या धाडसी चोरीमुळे प्रवाशांमध्ये व नागरिकांमध्ये प्रचंड घबराट पसरली आहे.

पाटोदा बस स्थानकातील सीसीटीव्ही कॅमेरे धूळ खात!

चोरीच्या घटनांनंतर पोलीस तपासासाठी सर्वात महत्त्वाचा दुवा मानले जाणारे पाटोदा बस स्थानकातील सीसीटीव्ही कॅमेरे गेल्या अनेक दिवसांपासून बंद अवस्थेत आहेत. प्रशासनाच्या या अनास्थेमुळे गुन्हेगारांचे धाडस वाढले असून, बस स्थानक परिसर चोरट्यांचे सुरक्षित केंद्र बनले आहे. सीसीटीव्ही बंद असल्याने पोलिसांना तपासात मोठे अडथळे येत आहेत.

**पाटोदा पोलीस थंडगार; एसपी नवनीत कावत यांच्या हस्तक्षेपाची मागणी**

पाटोदा परिसरात चोरी, घरफोडी आणि सोनसाखळी चोरीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. मात्र, गुन्हेगारांवर वचक बसवण्यात पाटोदा पोलीस ठाणे पूर्णपणे अपयशी ठरल्याचा आरोप स्थानिक नागरिक करत आहेत. पोलीस गस्त नावालाच उरली असून पोलीस प्रशासन थंडगार भूमिकेत आहे. या गंभीर परिस्थितीची तातडीने दखल घेऊन बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक () नवनीत कावत यांनी पाटोदा पोलीस ठाण्याच्या कारभाराचा स्वतः आढावा घ्यावा, पाटोदा बस स्थानकासह शहरातील बंद असलेले सीसीटीव्ही तातडीने सुरू करावेत आणि निष्क्रीय पोलिसांवर कडक कारवाई करून नागरिकांना सुरक्षा प्रदान करावी, अशी जोरदार मागणी पाटोदा शहरवासीय व व्यापाऱ्यांकडून केली जात आहे.

### पाटोदात हिंदू महिलांचे

तपासणी करून दोषींवर गुन्हे दाखल करावेत.

महिला अधिकाऱ्याच्या धाडसामुळे प्रकरण आले समोर

या संपूर्ण प्रकरणात एका सजग महिला अधिकाऱ्याने धाडस दाखवून या गंभीर प्रकाराला वाचा फोडली. त्यामुळे १८ पगड जातींचे लोक आणि सर्व समाजबांधव एकत्र येऊन या कृत्याचा तीव्र निषेध नोंदवत आहेत. भविष्यात अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती झाल्यास तीव्र स्वरूपाचे जनआंदोलन उभारण्यात येईल, असा सज्जड इशाराही यावेळी देण्यात आला आहे. या निवेदनाची प्रत बीड जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, पाटोदा उपविभागीय अधिकारी आणि पाटोदा तहसीलदार यांनाही देण्यात आली असून, प्रशासनाने तातडीने पावले उचलण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

### प्रभाग क्रमांक १० मध्ये

कामाला सुरुवात झाली असून, सदर काम सध्या प्रगतीपथावर आहे. या कामामुळे सांडपाण्याचा योग्य पद्धतीने निचरा होण्यास मदत होणार असून, नागरिकांना होणारा त्रास कमी होऊन परिसरातील स्वच्छतेचा प्रश्नही मार्गी लागणार आहे. प्रभागातील नागरिकांच्या दैनंदिन अडचणी समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी नगरसेवक अक्षय धोंडे यांनी केलेल्या पाठपुराव्याचे नागरिकांकडून कौतुक होत आहे. तसेच विकासकामासाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आमदार सुरेश आण्णा धस यांचेही नागरिकांनी आभार मानले. ''नागरिकांची समस्या हीच आपली प्राथमिकता'' या भूमिकेतून प्रभागातील मूलभूत प्रश्न सोडविण्यासाठी सुरू असलेल्या या कामामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असल्याची भावना प्रभागवासीयांनी व्यक्त केली.

### गजानन विद्यालयात

वनस्पती ही मानवाची रक्षण करती आहे म्हणून वृक्षास राखी बांधून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांनींनी विद्यार्थ्यांना राखी बांधून भाऊ बहिणीचे नाते दृढ आहे ही भावना जागृत केली. मुली ह्या आमच्या भगिनी असून त्यांचे रक्षण करणे हे आमचे कर्तव्य आहे अशी शपथ याप्रसंगी विद्यार्थ्यांनी घेतली. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य पवळ म्हणाले की, महाभारतापासून हा भाऊ बहिणीचा सण उत्सव सुरू झाला असून ज्या पद्धतीने भगवान श्रीकृष्णाने भगिनी द्रुपतीचे रक्षण केले त्याच धर्तीवर आज विद्यालयातील सर्व मुली या आपल्या भगिनी असून भगवान श्रीकृष्ण प्रमाणे आपण त्यांचे रक्षण केले पाहिजे असे त्यांनी सांगितले. यावेळी उपमुख्याध्यापक प्रकाश राठोड, पर्यवेक्षक दगडे व्ही.एन., शेख एस.वाय., भोसले बी. एस. यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयदीप सरवदे यांनी केले तर शेवटी नितीन शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# पंकजा मुंडेंच्या मार्गदर्शनाखाली युवा मोर्चाची जिल्हा कार्यकारिणी जाहीर

वडवणी । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हा भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजय आंधळे यांनी जिल्हा कार्यकारिणी जाहीर केली आहे. या नव्या कार्यकारिणीत सर्व जाती धर्माच्या युवकांना प्राधान्य देऊन चांगला संदेश देण्यात आला आहे. पंकजा मुंडे यांनी जिल्ह्यात भाजपची संघटनात्मक फळी मजबूत करण्याच्या दृष्टीने युवा मोर्चाच्या माध्यमातून युवकांना न्याय दिला आहे. नव्या कार्यकारिणीत ओबीसी, मायक्रो ओबीसी, मराठा, मुस्लिम, मागासवर्गीय आदी विविध जाती धर्माला प्रतिनिधित्व देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या कार्यकारिणीत ७ सरचिटणीस, ११ उपाध्यक्ष, १५ सचिव, १० सदस्य आणि एक कोषाध्यक्ष आहे. प्रत्येकाला न्याय देण्याचा प्रयत्न-पंकजा मुंडे संघटनेत असंख्य कार्यकर्ते असताना प्रत्येकाला पद देणं, यात सामावून घेणं माझ्यासाठी कठीण होतं, तरी देखील प्रत्येकाला संधी दिली आहे. भविष्यात वेगवेगळ्या माध्यमातून प्रत्येक कार्यकर्त्यांस न्याय देण्याचा माझा प्रयत्न असेल असे पंकजा मुंडे म्हणाल्या आहेत. अशी आहे कार्यकारिणी सरचिटणीस चंद्रकांत देवकते (परळी), संग्राम बांगर (बीड), युवराज वायबसे, किशोर खोले (आष्टी), विष्णू आगे (माजलगाव), विकास पवार (गेवराई), उत्तरेश्वर निंगुळे (केज) उपाध्यक्ष संतोष सोळंके (परळी), विलास काचगुडे (अंबाजोगाई), ॲ. नागेश तांबारे, पियुष सवई (बीड), विवेक पाखरे, संभाजी झांबरे (आष्टी), सुरज घुले (केज), रणजित रुपनर (धारुर), भिष्माचार्य दाभाडे (गेवराई), शहाजी सोळंके (माजलगाव), विनोद बांगर (पाटोदा) कोषाध्यक्ष - केशव बडे (बीड), सचिव - गोविंद मुंडे (परळी), मनोज कोरडे (माजलगाव), भुषण पवार, सुशिल जाधव, आनंद राऊत (बीड), माऊली पानसंबळ, सचिन वारे, आशिष जायभाये (शिरुर), मनोज गुंड, करण काळे (गेवराई), वैजनाथ देशमुख (केज), गणेश बडे (धारुर), महादेव लटपटे, शंभुराज महारनोर (आष्टी), सय्यद अन्सार (अंबाजोगाई) सदस्य - इश्वर भांगे, सुनिल चादर, श्यामसुंदर पाटील (गेवराई), सुधीर सोनवणे (पाटोदा), अमोल वाघमारे, सुधाकर मुळे (बीड), तुकाराम हंडे (माजलगाव), रुपेश लगड, बाळासाहेब तिडके (धारुर), संतोष गडदे (अंबाजोगाई)



# युसूफवडगावच्या तिघांची पवित्र पोर्टलद्वारे शिक्षकपदी निवड
# एकाच वेळी तिघांना सरकारी नोकरी; तिघांचीही पालघर जिल्हा परिषदेत नियुक्ती

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगाव येथील यश देविदास वायकर,सौ.शुभदा बालाजी चोपणे व संदिप डोंगरे या तिघांची महाराष्ट्र शासनाच्या पवित्र पोर्टलद्वारे



जाहीर झालेल्या शिक्षक भरतीच्या निवड यादीत निवड झाली असून, तिघांचीही पालघर जिल्हा परिषदेत शिक्षकपदी नियुक्ती झाली आहे. एकाच वेळी गावातील तिघांची सरकारी शिक्षकपदी निवड होण्याची ही बहुधा पहिलीच वेळ असल्याने गावकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

सर्वसाधारण शेतकरी कुटुंबातून आलेले यश देविदास वायकर व संदिप डोंगरे यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत मिळविलेले हे यश विशेष कौतुकास्पद ठरले आहे. मेहनत, जिद्द आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर त्यांनी शिक्षक होण्याचे स्वप्न साकार केले आहे.तर सौ. शुभदा चोपणे यांनी लग्नानंतर कुटुंब आणि शिक्षण या दोन्हींचा योग्य समतोल साधत निरंतर अभ्यास करून हे यश संपादन केले आहे. त्या युसूफवडगाव येथील प्राथमिक शिक्षक बालाजी चोपणे यांच्या पत्नी आहेत. कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळत अभ्यासासाठी वेळ देऊन त्यांनी मिळविलेले यश निश्चितच प्रेरणादायी असून, त्यांचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे.

विशेष म्हणजे, युसूफवडगावच्या तिघांची एकाच वेळी निवड झाली असून तिघांचीही नियुक्ती पालघर जिल्हा परिषदेत शिक्षक म्हणून झाली आहे. त्यामुळे या यशाची गावात विशेष चर्चा होत आहे. त्यांच्या यशामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसमोर स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून सरकारी सेवेत जाण्याचा आदर्श निर्माण झाला आहे.यश वायकर,सौ.शुभदा चोपणे व संदिप डोंगरे यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल युसूफवडगाव ग्रामस्थांच्या वतीने त्यांचे स्वागत व अभिनंदन करण्यात येत असून, पुढील शैक्षणिक सेवेसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# प्रत्यक्ष यशापेक्षा यशासाठी आवश्यक असणारी गुणवत्ता विद्यार्थ्यांना मिळावी - डॉ.राजेश इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

प्रत्येक पालकाला, शिक्षकांना आपला विद्यार्थी यशस्वी व्हावा असे वाटते. त्याकरिता ते प्रयत्न देखील करत असतात परंतु यश महत्त्वाचे की यशासाठी आवश्यक असणारी गुणवत्ता महत्त्वाची हा प्रश्न ज्यावेळेस येतो, त्यावेळेस यश मिळवण्यासाठी आवश्यक असणारी गुणवत्ता हीच महत्त्वाची ठरते. हीच गुणवत्ता यशामधील सातत्य टिकवून ठेवते असे महत्त्वपूर्ण वक्तव्य सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ञ तथा विद्यार्थी समुपदेशक व्याख्याते राजेश इंगोले यांनी न्यू इंग्लिश स्कूल येथे आयोजित आर के ऑनर्स विद्यार्थी शिक्षक व पालक मेळाव्यात केले. संस्थेचे विशेष कार्यकारी संचालक राजेश कराड व विशेष विश्वस्त राहुल कराड यांच्या वाढदिवसानिमित्त हे व्याख्यान सत्र आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी विचार मंचावर उद्घाटक म्हणून गोपाळ बुवा साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक रणवीर कराड व शाळेचे मुख्याध्यापक म मा भस्मे उपस्थित होते.




कार्यक्रमाची सुरुवात स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून तसेच दीप प्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी श्रीमती अश्विनी तोडकर यांनी स्वागत गीत गायले . कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना मुख्याध्यापक मा मा भस्मे यांनी या शाळेमध्ये सर्वसामान्य कुटुंबातील मुले शिक्षण घेत आहेत. या सर्वसामान्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून त्यांना यशाचा मार्ग दाखवणारी ही संस्था असून याच संस्थेचे अनेक विद्यार्थी हे आज विविध उच्च पदांवर कार्यरत आहेत याचा सार्थ अभिमान असल्याचे प्रा भस्मे यांनी याप्रसंगी सांगितले. संस्थेत चालविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक उपक्रमांची माहिती देखील त्यांनी दिली.

आपले मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त करताना येथील सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ञबतथा समुपदेशक डॉ राजेश इंगोले यांनी विद्यार्थी हा शिक्षणाचा केंद्रबिंदू असला पाहिजे विद्यार्थ्यांना शिक्षण हे सक्तीचे न वाटता आवडीचे वाटले पाहिजे आणि ही आवड निर्माण करण्याचे काम पालक आणि शिक्षक या दोघांनी करावे अशी अपेक्षा राजेश इंगोले यांनी सांगितले. शिक्षण आणि मन यांचा खूप जवळचा संबंध असल्याने शिक्षक तथा पालकांनी विद्यार्थ्यांच्या मनाची मशागत करणे आवश्यक आहे, अन्यथा यशातील सातत्य टिकून राहणे अवघड जाते.

डॉ इंगोले यांनी प्रत्यक्ष वस्तूस्थितीमध्ये पालकांच्या मनोवृत्तीच्या विविध प्रकाराची विवंचना करतांना पालकांच्या विविध मनोवृत्ती मुळे मुलांची मनाची अवस्था ही अवघडल्यासारखी होते. त्यामुळे पालकांनी आपली मते मुलांवर लादण्यापेक्षा संतुलित पालक बनणे अधिक गरजेचे असते असा मौलिक सल्ला उपस्थित पालकांना दिला. विद्यार्थ्यांनी आयुष्यामध्ये काय बनावे यापेक्षा विद्यार्थ्यांवर शिक्षक व पालकांनी मानवी मूल्य व संस्कार देण्याचा प्रयत्न करून सर्वप्रथम त्यांना माणूस म्हणून घडवण्याचा प्रयत्न केला पाहिजे असेही नमूद केले.समाजात सुसंस्कारित नैतिक अधिष्ठान असलेली पिढी, नैतिक अधिष्ठान असलेला समाज घडवत असते आणि असा नैतिक समाज नैतिक राष्ट्राची उभारणी करत असतो त्यामुळे संस्कार व मानवी मूल्य ही विद्यार्थ्यांसाठी अत्यावश्यक असल्याचे डॉ राजेश इंगोले यांनी यावेळी स्पष्ट केले.

मुलांच्या अभ्यास विषयक समस्या, वर्तन विषयक समस्या याविषयी अत्यंत सोप्या मार्मिक भाषेत शिक्षक व पालकांचे समुपदेशन केले. प्रत्येक पालकांनी आपला गुणवत्ता पूर्ण वेळ आपल्या पाल्यांसोबत व्यतीत केला पाहिजे. त्यांच्यासोबत विश्वासाचे, प्रेमाचे नाते निर्माण केले पाहिजे. मुलांना निर्णय व मत मांडण्यासाठी प्रव्रत केले पाहिजे. स्वतःचे मत व निर्णय प्रक्रिया घेऊ शकणारी पिढीच आपल्या ध्येयाच्या दिशेने सातत्यपूर्ण प्रवास करू शकते. निर्णय घेण्याच्या स्वातंत्र्यामुळे मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण होऊन त्या मुलांमध्ये नैसर्गिकरीत्या नेतृत्व गुण विकसित होतात हीच बाब व्यक्तिमत्व विकासाचा मैलाचा दगड ठरू शकते असे मत डॉ राजेश इंगोले यांनी यावेळी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रीमती अनुजा पवार यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी न्यू इंग्लिश स्कूलच्या सर्व शिक्षक वृंद आणि कर्मचारी वृंद यांनी परिश्रम घेतले.

# शेतकऱ्याने १० एकर सोयाबीनवर फिरवला नांगर

## पावसाने दडी मारल्याने हातातोंडाशी आलेला घास गेला वाया

परभणी : सध्या राज्यातील शेतकरी मोठ्या संकटात सापडले आहेत. कारण पावसानं दडी मारल्यामुळं खरीपाची पिकं धोक्यात आली आहेत. तर काही ठिकाणी खरीपाची पिके करपली आहेत. अशीच स्थिती परभणी जिल्ह्यात देखील आहे. परभणी जिल्ह्यातील एका शेतकऱ्याने १० एकर सोयाबीनवर नांगर फिरवला आहे. पावसाअभावी सोयाबीन वाळून गेल्याने शेतकऱ्याने हा निर्णय घेतलाय. परभणीच्या मानवत तालुक्यातील रामपुरी बुद्रुक इथं हा प्रकार घडला आहे.

परभणी जिल्ह्यात पावसाने पुन्हा एकदा शेतकऱ्यांची चिंता वाढवली आहे. पावसाने मोठा खंड दिल्याने ऐन शेंगा भरण्याच्या अवस्थेत असलेले सोयाबीन पीक वाळून चालले आहे. त्यामुळं उत्पादनाची आशा मावळलेल्या एका शेतकऱ्याने तब्बल १० एकर क्षेत्रावरील सोयाबीन पिकावर नांगर फिरवला आहे. परभणीच्या मानवत तालुक्यातील रामपुरी बुद्रुक येथील हा प्रकार समोर आला आहे. शेतकरी मंगलबाई दत्तराव हिक्के यांनी मोठ्या मेहनतीने आणि खर्च करून आपल्या शेतात



सोयाबीनची लागवड केली होती. मात्र पीक वाढीच्या आणि शेंगा भरण्याच्या महत्त्वाच्या टप्प्यावर पावसाने दडी मारली. परिणामी पिकाला आवश्यक ओलावा मिळाला नाही आणि सोयाबीन वाळू लागले. पिकाची अवस्था दिवसेंदिवस खराब होत असल्याने शेतकऱ्यासमोर मोठा आर्थिक प्रश्न निर्माण झाला आहे. पीक वाचण्याची शक्यता कमी झाल्याने अखेर नाईलाजाने त्याने १० एकर सोयाबीनवर नांगर फिरवण्याचा निर्णय घेतला आहे. एका बाजूला लागवडीसाठी झालेला खर्च आणि दुसऱ्या बाजूला हातातोंडाशी आलेले पीक वाया गेल्याने शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. पावसाअभावी केवळ एका शेतकऱ्याचीच नव्हे, तर परिसरातील अनेक शेतकऱ्यांची सोयाबीन पिके धोक्यात आली आहेत. ऐन उत्पादनाच्या काळात पावसाने साथ सोडल्याने शेतकऱ्याच्या डोळ्यासमोर उभे पीक उद्ध्वस्त झाले आहे. त्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने तातडीने मदत आणि नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी होत आहे. दरम्यान, पावसाळा सुरु होऊन तीन महिन्यांचा कालावधी होत आला आहगे. तरीदेखील राज्याच्या अनेक भागात पाऊस नसल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. त्यामुळं शेतकरी मोठ्या चिंतेत आहेत.पाऊस नसल्यामुळं शेतकऱ्यांची खरीपाची पिकं वाया चालली आहे. तर अनेक ठिकाणी जनावरांच्या पाण्याचा चाऱ्याचा प्रश्न देखील निर्माण झाली आहे.

## पौष्टिक आणि जमिनीचा सुपीकपणा वाढवणारे पीक; वाल लागवड




वाल लागवड ही महाराष्ट्रात, विशेषतः कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि खान्देश भागात मोठ्या प्रमाणावर केली जाणारी भाजीपाला व कडधान्य शेती आहे. वाल हे अत्यंत पौष्टिक आणि जमिनीचा सुपीकपणा वाढवणारे पीक आहे. हवामान आणि जमीन :वाल हे मुख्यत्वे थंड आणि कोरड्या हवामानात चांगले येते. जास्त तापमान किंवा अतिवृष्टी या पिकाला सहन होत नाही. मध्यम ते भारी, पाण्याचा चांगला निचरा होणारी जमीन योग्य ठरते. जमिनीचा सामू ६.५ ते ७.५ असावा. प्रमुख सुधारित वाण/जाती : कोकण वाल १ – कोकण प्रदेशासाठी अत्यंत उपयुक्त, दाणेदार आणि चविष्ट. कोकण भुषण – झुडूपयुक्त (वेली नसलेली) जात. जोडपिकासाठी उत्तम. पुसा अर्ली रनर – जास्त उत्पादन देणारी जात. दीपाली / दीप्ती – भाजीच्या शेंगांसाठी उत्तम वाण. लागवडीचा काळ आणि पद्धत : रब्बी हंगाम (सर्वात योग्य वेळ) – ऑक्टोबर ते नोव्हेंबर (भात कापणीनंतर ओलसर जमिनीवर वाफसा स्थितीत पेरणी केली जाते). खरीप हंगाम – जून ते जुलै (पावसाच्या पाण्यावर). बियाण्यांचे प्रमाण : झुडूप जातीसाठी = ३० ते ३५ किलो प्रति हेक्टरी. वेल वर्ग जातीसाठी – १५ ते २० किलो प्रति हेक्टरी. लागवडीचे अंतर : दोन ओळींत – ४५ ते ६० सेमी. दोन रोपांत – २० ते ३० सेमी. बीजप्रक्रिया : पेरणीपूर्वी बियाण्यास रायझोबियम हे जिवाणू संवर्धन (२५ ग्रॅम प्रति किलो बियाणे) लावावे. यामुळे हवेतील नायट्रोजन शोषून घेण्याची क्षमता वाढते आणि खताची बचत होते. खत आणि पाणी व्यवस्थापन : लागवडीवेळी प्रति हेक्टरी २५ किलो नत्र, ५० किलो स्फुरद आणि ५० किलो पालाश द्यावे. भात कापणीनंतर लागवड केल्यास सुरुवातीला जमिनीतील ओलाव्यावरच पीक येते. इतर जमिनींमध्ये हवामानानुसार १० ते १२ दिवसांच्या अंतराने २ ते ३ पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. फुलोरा आणि शेंगा भरण्याच्या टप्प्यावर पाणी देणे अत्यंत महत्त्वाचे आहे.वेलींना आधार देणे : जर तुम्ही वेल वर्ग जातीची लागवड केली असेल, तर शेंगांची प्रत चांगली राहण्यासाठी आणि रोग कमी होण्यासाठी बांबू, काठ्या किंवा तारेचा आधार देऊन वेली वर चढवाव्यात. रोग व किडीचे व्यवस्थापन : मावा आणि तुडतुडे ही कीड कोवळ्या पानांतून आणि शेंगांतून रस शोषून घेते. याच्या नियंत्रणासाठी डायमेथोएट किंवा इमिडाक्लोप्रिड ची फवारणी करावी. तांबेरा व भुरी- पानांवर पांढरे/तपकिरी डाग पडतात. यावर मात करण्यासाठी घुलनशील गंधक फवारावे. काढणी आणि उत्पादन : भाजीच्या शेंगांसाठी पेरणीनंतर ६० ते ७० दिवसांत कोवळ्या शेंगांची तोडणी सुरू होते. वाळलेल्या दाण्यांसाठी: १०० ते १२० दिवसांत शेंगा पूर्ण वाळल्यावर काढणी केली जाते.

## लिंबाच्या ‘टॉप तीन जाती’: त्यांची वैशिष्ट्ये आणि ख्याती!

लिंबामध्ये दोन प्रकार आहेत एक लाईम म्हणजेच पातळ सालीचे लिंबू आणि दुसरा प्रकार लेमन म्हणजेच जाड सालीचे लिंबू. महाराष्ट्र राज्यात कागदी लिंबाच्या फळांना जास्त मागणी असल्यामुळे त्यांची लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते. लेमनची फळे लोणच्यासाठी चांगली असतात.

कागदी लिंबामध्ये स्थानिक जातीपासून लागवड झालेली झाडे मोठ्या प्रमाणावर आढळतात अधिक उत्पादन देणाऱ्या फळांची उत्तम प्रत असलेल्या जाती आता प्रसारित करण्यात आलेल्या आहेत. त्यांची निवड करणे शेतकऱ्यांना जास्त फायद्याचे ठरते. त्यापैकी काही जाती जसे प्रमालीनी, विक्रम, साई शरबती, त्यांचे गुणधर्म खालीलप्रमाणे आहेत.



प्रमालिनी : स्थानिक जातीपेक्षा ३५ ते ३९ टक्के जास्त उत्पादन देणारी. फळधारणा घोसात (गुच्छात ३ ते ७ फळे). फळधारणा जून-जुलै व नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये होते. रसाचे प्रमाण ५७ टक्के. विक्रम : स्थानिक जातीपेक्षा ३० ते ३२ टक्के उत्पादन जास्त. फळे ५ ते १० गुच्छात येतात. फळ साधारण जून-जुलै, नोव्हेंबर-डिसेंबर व नेहमीच्या हंगामा व्यतिरिक्त होते व उन्हाळ्यात फळे मिळतात. साई शरबती : पश्चिम महाराष्ट्रातील स्थानिक जातीपासून निवड पद्धतीने जात विकसीत केली आहे. फळे नियमित आकाराची जास्त विद्राव्य पदार्थ व आम्लता असलेली व अधिक उत्पादन देणारी जात. उन्हाळ्यात २५ टक्के जास्त उत्पादन देणारी. रसाचे प्रमाण ५५ टक्के. खैऱ्या रोगास प्रतिकारक.

## डिजिटल पीक पाहणी रखडली; केवळ सहा टक्के क्षेत्रावरील पिकांची नोंद

पुणे / प्रतिनिधी

डिजिटल क्रॉप सर्वे ॲपमध्ये पीक पाहणी सहाय्यकांनी केलेल्या नोंदींची शंभर टक्के पडताळणी करण्याच्या सक्तीविरोधात तलाठ्यांनी पुकारलेल्या बहिष्कारामुळे राज्यातील पीक नोंदणी आणि पडताळणीचे काम रखडले आहे.

राज्यात आतापर्यंत केवळ २३ लाख ५५ हजार हेक्टर क्षेत्रावरील पिकांची नोंद झाली असून, एकूण क्षेत्राच्या तुलनेत हे प्रमाण अवघे सहा टक्के आहे. त्यापैकी तलाठ्यांनी केवळ तीन लाख ९१ हजार हेक्टर क्षेत्रावरील नोंदींची पडताळणी केली आहे. एकूण पाहणी झालेल्या क्षेत्राच्या तुलनेत पडताळणीचे प्रमाण सुमारे २० टक्के असल्याचे सांगण्यात आले. पीक पाहणी सहाय्यकांनी



केलेल्या नोंदींमधील चुका, त्रुटी किंवा अपूर्ण कामासाठी तलाठ्यांना जबाबदार धरण्याच्या कार्यपद्धतीला महाराष्ट्र राज्य तलाठी संघाने विरोध केला आहे. यासंदर्भात संघाचे अध्यक्ष निळकंठ उगले यांनी महसूल विभागाच्या अपर मुख्य सचिवांना सविस्तर निवेदन दिले आहे. आवश्यक सुधारणा होईपर्यंत पीक पाहणीच्या प्रमाणीकरणाच्या कामावरील बहिष्कार सुरू ठेवण्याची भूमिका संघाने घेतली आहे. राज्यात ॲग्रीस्टॅकअंतर्गत डिजिटल क्रॉप सर्वेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या पिकांची छायाचित्रे आणि जीपीएस लोकेशनसह नोंद केली जात आहे. या कामासाठी पोलिस पाटील, ग्रामपंचायत कर्मचारी, आशा व अंगणवाडी सेविका, सीएससी चालक तसेच अन्य व्यक्तींची पीक पाहणी सहाय्यक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र हे सहाय्यक तलाठ्यांच्या थेट प्रशासकीय नियंत्रणाखाली नसतानाही त्यांच्या कामातील चुका, अपूर्ण नोंदी किंवा निष्क्रियतेची जबाबदारी तलाठ्यांवर निश्चित केली जात असल्याचा संघाचा आक्षेप आहे.

## जनावरांना गूळ खाऊ घालण्याचे फायदे व तोटे

बरेच पशुपालक आपल्या जनावरांना गुळ खाण्यासाठी देतात. गुळामध्ये कॅल्शियम जास्त असते असे, अनेक पशुपालकांना वाटते. परंतु गुळामध्ये कॅल्शियमचे प्रमाण किती असते व तो किती व कधी खायला द्यावा, याबाबत जाणून घेण्याची गरज आहे.

गुळामध्ये असणारे अन्नघटक : गुळामध्ये ८० टक्के सुक्रोज, १० टक्के ग्लुकोज व फ्रुक्टोज, ५ ते ७ टक्के पाणी आणि उरलेले ३ टक्के क्षार घटक असतात. १०० ग्रॅम गुळामध्ये ४० ते १०० मि.ग्रॅ. कॅल्शियम असते. म्हणजे १ किलो गुळ जनावरांना खाऊ घातल्यास फक्त १ ग्रॅम कॅल्शियम मिळते. त्याचबरोबर मॅग्नेशियम, फॉस्फरस, सोडियम यांचे देखील प्रमाण ३० ते १०० मि.ग्रॅ प्रति १०० ग्रॅम असते. लोह १०-१३ मि.ग्रॅ. प्रति १०० ग्रॅम असते. दुधाळ जनावरांना २० ते २५ मि.ग्रॅ. लोह आवश्यक असते. त्यामुळे गुळामधून जनावरांना लोह चांगल्या प्रमाणात मिळते. परंतु हा गुळ लोखंडाच्या कढईत पारंपरिक पद्धतीने बनवला असेल तरच त्या गुळामध्ये लोहाचे प्रमाण चांगले असते. गुळातील अन्नघटकाचा विचार केला तर गुळामधून जनावरांना कॅल्शियम नगण्य प्रमाणात मिळते.



जनावरांना गुळ खायला द्यावा की नाही? गुळामध्ये शर्करेचे प्रमाण जास्त असल्याने जनावरांना थोड्या प्रमाणात गुळ खायला दिल्याने लगेच ऊर्जा मिळते. परंतु जनावरांना गरजेपेक्षा जास्त म्हणजे २०० ग्रॅम पेक्षा जास्त गुळ खायला दिला आणि त्याचबरोबर सकस हिरवा चारा दिला तर जनावरांच्या पोटामध्ये शर्करेचे प्रमाण वाढते.

पोटातील जिवाणू लॅक्टीक असिड मोठ्या प्रमाणावर तयार करतील, त्यामुळे असिडोसिस होण्याची शक्यता असते. असिडोसिसमुळे जनावरांचे पचन बिघडते. त्यामुळे जनावरांना गरज असेल तरच व प्रमाणात गुळ देणे महत्त्वाचे आहे.

गुळ कधी खाऊ घालावा? जनावरे विल्यानंतर जनावरांना मोठ्या प्रमाणात ऊर्जा मिळणे गरजेचे असते. कारण जनावर विण्याच्या अगोदर कमी प्रमाणात चारा खाते किंवा चारा खात नाही. वासराचे वजन जनावराच्या कोटीपोटावर पडल्यामुळे जनावराची चारा खाण्याची व रवंथ करण्याची क्षमता कमी झालेली असते. जनावर विल्यानंतर गर्भाशयातून रक्तस्राव होतो त्यामुळे जनावरे व्यायलानंतर जनावराला लवकर ऊर्जा मिळण्यासाठी गुळ खायला देणे फायदेशीर असते.

गुळ कसा खायला द्यावा? जनावर व्यायल्यानंतर कोमट पाण्यामध्ये २०० ग्रॅम गुळ विरघळवून जनावरांना द्यावा. त्याचबरोबर २०० ते २५० ग्रॅम तृणधान्याच्या लापशीमध्ये १०० ग्रॅम गुळ घालून व्यायलेल्या जनावराला द्यावा.

जनावरांना बनवलेल्या लापशीमध्ये २०० ते २५० ग्रॅमपेक्षा जास्त तृणधान्याचे प्रमाण असू नये. गुळामध्ये कॅल्शियमचे प्रमाण हे फार कमी असते, त्यामुळे जनावरांमधील कॅल्शियमची कमतरता भरून काढण्यासाठी गुळाचा वापर करू नये.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५७४ : गुरू रामदास शिखांचे चौथे गुरू बनले.
१६५९ : मुघल शासक औरंगजेब यांनी आपला मोठा भाऊ दारा शिकोह यांना फाशी दिली.
१८३५ : ऑस्ट्रेलियातील मेलबर्न शहराची स्थापना झाली.
१८३५ : अमेरिकेतील ह्युस्टन शहराची स्थापना झाली.
१९२८ : पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय स्वातंत्र्य लीग ची स्थापन करण्यात आली.
१९४५ : दुसरे महायुद्ध ब्रिटिश सैन्याने हाँगकाँगची जपानच्या अधिपत्यातुन सुटका केली.
१९७९ : सुमारे दहा लाख हायड्रोजन बॉम्बच्या स्फोटांएवढी ऊर्जा निर्माण करुन 'हॉवर्ड-कुमेन-मायकेल्स' हा धूमकेतू सूर्याच्या पृष्ठबागावर आदळला. सूर्याच्या पृष्ठभागावर धूमकेतू आदळण्याची मानवी इतिहासातील ही पहिली नोंद आहे.
१९८४ : अमेरिकन अंतराळ यान डिस्कव्हरी ने पहिल्यांदा अवकाशात भरारी केली.
२००९ : भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) ने चंद्रयान-१ मोहीम ही औपचारिकरित्या समाप्त केली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५५९ : मुघल सम्राट अकबर यांचा मुलगा जहांगीर ४ यांचा जन्मदिन.
१५६९ : जहांगीर ४ था मुघल सम्राट (मृत्यू: २८ आक्टोबर १६२७)
१७२० : व्हिटब्रेड हॉटेल्स चे संस्थापक सॅम्युअल व्हिटब्रेड यांचा जन्म. (मृत्यू: ११ जून १७९६)
१८१२ : ब्यूएना विस्टा वाइनरी चे संस्थापक अगोगोस्टन हरसथी यांचा जन्म. (मृत्यू: ६ जुलै १८६९)
१८१३ : ना. धों. ताम्हनकर लेखक, बालसाहित्यिक (मृत्यू: ५ जानेवारी १९६१)
१८५० : काशिनाथ त्र्यंबक तेलंग प्राच्यविद्या संशोधक, न्यायमूर्ती, कायदेपंडीत, समाजसुधारक, अखिल भारतीय काँग्रेसचे एक संस्थापक, काँग्रेसचे चिटणीस (१८८५-१८८९), मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू (१८९२), हिंदू कायद्यात सुधारणा होण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. भगवद्गीतेचा त्यांनी इंग्रजीत अनुवाद केला. (मृत्यू: १ सप्टेंबर १८९३)
१८७१ : अर्नेस्ट रुदरफोर्ड नोबेल पारितोषिक विजेते ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: १९ आक्टोबर १९३७)
१८८३ : जगन्नाथ गणेश गुणे तथा स्वामी कुवलयानंद योगविद्येचे पुरस्कर्ते व शारीरिक शिक्षणतज्ञ, त्यांनी १९२४ मध्ये 'कैवल्यधाम' नावाची योगशिक्षणसंस्था स्थापन केली. संस्थेतील प्रयोगांची माहिती व्हावी यासाठी 'योगमीमांसा' नावाचे त्रैमासिक काढले. त्याचे ७ खंड प्रकाशित झाले आहेत. (मृत्यू: १८ एप्रिल १९६६ मुंबई)
१९०३ : भगवतीचरण वर्मा हिन्दी कथाकार, कादंबरीकार, कवी, एकांकिकाकार, पटकथाकार व नाटककार, पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित लेखक (मृत्यू: ५ आक्टबर १९८१)
१९०४ : नवल होर्मुसजी टाटा उद्योगपती, पद्मभूषण १९६९
१९२३ : शंकरदास केसरीलाल ऊर्फ 'शैलेन्द्र' गीतकार (मृत्यू: १४ डिसेंबर १९६६)
१९३० : वॉरन बफे अमेरिकन उद्योगपती आणि दानशूर
१९३० : दशरथ पुजारी संगीतकार (मृत्यू: १३ एप्रिल २००८ डोंबिवली, मुंबई)
१९३४ : बाळू गुप्ते लेग स्पिन गोलंदाज (मृत्यू: ५ जुलै २००५)
१९३७ : मॅक्लारेन रेसिंग टीम चे संस्थापक ब्रुस मॅक्लारेन यांचा जन्म. (मृत्यू: २ जून १९७०)
१९५४ : बेलारूस देशाचे पहिले अध्यक्ष अलेक्झांडर लुकासेंको यांचा जन्म.
१९५४ : भारतीय वकील आणि राजकारणी रवीशंकर प्रसाद यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७७३ : सुमेर गार्दी याने नारायणराव पेशवे यांची शनिवारवाड्यात हत्या केली. (जन्म: १० ऑगस्ट १७५५)
१९४० : सर जे. जे. थॉमसन इलेक्ट्रॉनच्या शोधाबद्दल १९०७ चे नोबेल पारितोषिक विजेते इंग्लिश भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: १८ डिसेंबर १८५६)
१९४७ : नारायण मुरलीधर गुप्ते ऊर्फ 'कवी बी' त्यांची ‘चाफा बोलेना, चाफा चालेना ‘ ही कविता खूप प्रसिद्ध आहे. (जन्म: १ जून १८७२)
१९५२ : भारतीय रिजर्व बँकेचे पहिले गव्हर्नर ओसबोर्न स्मिथ यांचे निधन.
१९८१ : जयंत पांडुरंग तथा 'जे. पी.' नाईक शिक्षणतज्ञ, 'इंडियन इन्स्टिट्युट ऑफ एज्युकेशन'चे संस्थापक, 'नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँड ट्रेनिंग'चे संस्थापक, भारतामध्ये प्रथमच स्थापन केल्या गेलेल्या शैक्षणिक आयोगाचे सभासद सचिव (जन्म: ५ सप्टेंबर १९०७)
१९९४ : शंकर गोपाळ तथा शं. गो. तुळपुळे प्राचीन मराठी भाषेचे गाढे व्यासंगी, संत वाङ्मयाचे अभ्यासक व संशोधक, पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख (जन्म: ५ फेब्रुवारी १९१४)
१९९८ : नरहर वामन तथा 'नरुभाऊ' लिमये स्वातंत्र्यसैनिक, निर्भिड पत्रकार व काँग्रेसचे तत्त्वनिष्ठ नेते (जन्म: ८ नोव्हेंबर १९०९)
१९९९ चार्ल्स ब्रॉन्सन अमेरिकन अभिनेता (जन्म: ३ नोव्हेंबर १९२१)
२००८ : प्रसिद्ध भरतीय उद्योगपती व बिर्ला कुटुंबातील सदस्य कृष्ण कुमार बिर्ला यांचे निधन.
२०१४ : भारतीय मार्क्सवादी इतिहासकार व आधुनिक भारतातील आर्थिक आणि राजकीय इतिहासातील तज्ञ बिपीन चंद्र यांचे निधन. (जन्म: २७ मे १९२८)
२०१५ : भारतीय विद्वान लेखक एम. एम. कळबुर्गी यांचे निधन. (जन्म: २८ नोव्हेंबर १९३८)



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत
रविवार दि.३० ऑगस्ट २०२६ ५



# जनहिताच्या प्रमुख प्रकल्पांना निधी उपलब्ध करा

## खा. डॉ. कल्याण काळे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी ;वाढत्या गुन्हेगारी व मटका,गुटखावर कारवाई करा

जालना। प्रतिनिधी

जालना शहर व जिल्ह्यातील विविध महत्त्वाच्या प्रश्नांकडे लक्ष वेधत खा.डॉ. कल्याण काळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांना विविध मागण्याचे स्वतंत्र निवेदने देऊन तातडीने आवश्यक प्रशासकीय व निधीची तरतूद करण्याची मागणी केली आहे. तसेच जालना जिल्ह्यात गुटखा मटका सुरू असल्याची माहिती समोर आल्यामुळे सदरील धंदे बंद करण्यात यावे.औद्योगिक प्रदूषण, जालना येथील रसायन तंत्रज्ञान संस्थेचा विकास, हातवन बृहत्? लघु पाटबंधारे प्रकल्पासाठी भूसंपादन, घाणेवाडी तलावाची दुरुस्ती तसेच शेतकरी कर्जमाफी यासारख्या प्रश्नांकडे खा. डॉ. कल्याण काळे यांनी मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधले असल्याची माहिती जालना येथे जिल्हा काँग्रेस कार्यालयामध्ये डॉ. कल्याण काळे यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली. यावेळी खासदार डॉक्टर काळे म्हणाले की जालना शहर व परिसरातील वाढत्या औद्योगिकीकरणामुळे वायू, जल व ध्वनी प्रदूषणाची समस्या गंभीर होत असल्याचे खासदार काळे यांनी निदर्शनास आणून दिले आहे. एमआयडीसी परिसरातील गावांमध्ये नागरिकांना धूर, धुळीचे कण, पाण्याच्या गुणवत्तेच्या तक्रारी तसेच श्वसनासंबंधी त्रास होत असल्याने स्वतंत्र व सखोल प्रदूषण तपासणी करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. औद्योगिक आस्थापनांचे विशेष ऑडिट करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या उद्योगांवर कठोर कारवाई करावी, स्टील कारखान्यामुळे प्रदूषण होत असल्यामुळे कॅन्सर चे प्रमाण वाढले आहे. तसेच सांडपाण्याची नियमित तपासणी करण्याची मागणीही करण्यात आली आहे.



जालना येथील रसायन तंत्रज्ञान संस्थेच्या प्रलंबित बांधकामांना गती देऊन आवश्यक मनुष्यबळ व प्रशासकीय सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणीही मुख्यमंत्री यांच्याकडे करण्यात आली आहे. संस्थेच्या शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजासाठी कार्यरत शिक्षकांना कायमस्वरूपी पदस्थापना, स्वतंत्र नोंदणी/आस्थापना व्यवस्था, पूर्णवेळ संचालकाची नियुक्ती तसेच विद्यार्थ्यांसाठी प्रयोगशाळा, ग्रंथालय आणि इतर शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निधी व मनुष्यबळ देण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. दरम्यान, जालना तालुका व जिल्ह्यातील हातवन बृहत्? लघु पाटबंधारे प्रकल्पासाठी आवश्यक भूसंपादनाची कार्यवाही गतीने पूर्ण करून प्रकल्पाच्या कामासाठी १५० कोटी रुपयांचा निधी तातडीने उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यास त्याचा फायदा जालना शहरासह परिसरातील शेतीला सिंचनाची सुविधा मिळून शेतकऱ्यांना दीर्घकालीन लाभ होणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. जालना शहराच्या पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या घाणेवाडी तलावाच्या सांडव्यांची तातडीने दुरुस्ती करावी आणि तलावातील गाळ काढण्यासाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणीही खासदार काळे यांनी केली आहे. सांडव्यांच्या भिंतींमध्ये गंभीर स्वरूपाच्या भेगा पडल्याने भविष्यात धोका निर्माण होण्याची शक्यता असून, अतिवृष्टी झाल्यास परिस्थिती अधिक गंभीर होऊ शकते, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तलावातील गाळ साचल्यामुळे पाणी साठवण क्षमता कमी झाली असून गाळ काढल्यास शहराच्या पाणीपुरवठ्याला मोठा फायदा होईल, असेही त्यांनी म्हटले आहे. यासोबतच राज्यातील पात्र शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६' अधिक सर्वसमावेशक पद्धतीने राबविण्याची मागणी करण्यात आली आहे. ३१ मार्च २०१९ पूर्वीची पात्र थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांचा योजनेंतर्गत समावेश करावा, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रोत्साहनपर लाभाची कमाल मर्यादा दोन लाख रुपयांपर्यंत वाढवावी, जमीन वर्ग-२च्या कारणामुळे पात्र शेतकरी लाभापासून वंचित राहू नयेत, तसेच कागदपत्रे व ओळख क्रमांकाच्या तांत्रिक अडचणींमुळे कोणताही पात्र शेतकरी योजनेपासून वंचित राहू नये, अशी मागणी करण्यात आली आहे. या सर्व प्रश्नांवर मुख्यमंत्री यांनी संबंधित विभागांना तातडीने निर्देश देऊन आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा आणि प्रलंबित कामांना गती द्यावी, अशी मागणी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी केली आहे. सदरील पत्रकार परिषदेला श्री राजेंद्र राख, जालना पीपल्स बँकेचे मा. चेअरमन संजय मुथा,बदरभाई चाऊस,नंदू भैया जांगडे,कृष्णा पा.पडूळ,नरेंद्र मित्तल,सुनील चौधरी,अब्दुल हाफिज,संजय इंगळे,शेख वासिम,अशोकराव उबाळे,राजेंद्र गोरे,अविनाश चव्हाण,रघुवीर गुढे,सोपान तिरुखे,ज्ञानदेव इंगोले,वासिम पठाण,भागवत घाटे,कलीम खान,कल्याण तारडे आदी मान्यवर उपस्थित होते.

## अंबड शहर विकासासाठी परिसंवाद समिती सदस्यपदी कैलास राठी यांची निवड

अंबड। प्रतिनिधी

शहराच्या सर्वांगीण व शाश्वत विकासासाठी अंबड नगर परिषदेतर्फे 'शहर विकास विषयक परिसंवाद समिती' स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या सदस्यपदी कैलास राठी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शहराच्या विकासामध्ये नागरिकांचा सक्रिय सहभाग, तज्ज्ञांचे मार्गदर्शन तसेच विविध क्षेत्रांतील अनुभवी व जाणकार व्यक्तींच्या सूचनांचा उपयोग व्हावा, या उद्देशाने समितीची स्थापना करण्यात माध्यमातून शिक्षण, पर्यावरण संवर्धन, सार्वजनिक आरोग्य, आली आहे. समितीच्या स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन, नगररचना व शहर विकास, इस पाणीपुरवठा व सांडपाणी व्यवस्थापन, वाहतूक तसेच नागरिकांच्या विविध सुविधांशी संबंधित विकासात्मक विषयांवर वेळोवेळी परिसंवाद, चर्चा व विचारमंथन करण्यात येणार आहे. कैलास राठी यांच्या सामाजिक कार्यातील अनुभव व योगदानाचा शहर विकासासाठी उपयोग होईल, अशी अपेक्षा



नगर परिषद प्रशासनाने व्यक्त केली आहे. त्याच्या अनुभवातून शहराच्या विकासासाठी उपयुक्त सूचना, शिफारसी व संकल्पना प्राप्त होतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. समितीच्या बैठकीबाबत कैलास राठी यांना वेळोवेळी स्वतंत्रपणे कळविण्यात येणार आहे. त्यांच्या नियुक्तीबद्दल विविध स्तरातून अभिनंदन होत असून शहर विकासाच्या उपक्रमात ते सक्रिय सहभाग नोंदवतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. नियुक्तीपत्रावर मुख्याधिकारी राहुल सूर्यवंशी, यांच्या स्वाक्षरीने आदेश देण्यात आला आहे.

## पाथर्डी तालुक्यावर दुष्काळाचे ढग दाटले

पाथर्डी। प्रतिनिधी

जून जुलै व ऑगस्ट तब्बल तिमाही महिने संपले मान्सूनचा पावसाळा संपल्याचे चित्र आहे निसर्गराजा देवबाप्पा व कष्टकऱ्यांचा श्रमिकांचा पोळा व आई जगदंबाच्या पवित्र नवरात्र उत्सवात मेघगर्जनेसह अतिवृष्टी पाऊस नाही पडला तर मात्र जीवनमान प्राणीमात्रांसह धरणीमाय ज्वालामुखी प्रकोप दाखवण्याची शक्यता आहे तत्पूर्वी शासन व प्रशासनाने तातडीने वाढीव पाण्याचे टँकर पशुमात्रांसाठी चारा छावण्या सुरू करण्याची मागणी होत आहे खरीप हंगामातील कपाशी मूग सोयाबीन भुईमूग जवारी बाजरी शेतीपिके पाण्याअभावी पावसाअभावी जळून खाक होण्याच्या मार्गावर आहेत पाथर्डी तालुक्यात मुके जनावरे पशुधन वाचवण्यासाठी तातडीने चारा छावण्या सुरू करण्यात याव्यात व वाडी वस्ती तांडे गाव खेड्यात वाढीव पाण्याच्या टँकर खेपा वाढवण्याची मागणी जय जवान जय किसान कृषी सेवा केंद्राचे संचालक संजय कीर्तने यांनी केली आहे.



**जालना : जालना आगारात ५ नवीन राजमाता जिजाऊ बसचे लोकार्पण करण्यात आले. राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या जालना आगारात पाच नवीन राजमाता जिजाऊ बस दाखल झाल्या आहेत. या पाचही बसचे प्रवाशांच्या सेवेसाठी आज लोकार्पण करण्यात आले असून, या बस सिडको, बीड, सिल्लोड या ठिकाणी शटल सेवा देणार असल्याची माहिती आगारप्रमुख अजिंक्य जैवळ यांनी दिली.**



**जालना : भूमी पवार हिने आपल्या उत्कृष्ट क्रीडा कौशल्याची चमक दाखवत मुंबई पी१७ व्या कुडो राज्यस्तरीय व ७ व्या मेयर्स कप स्पर्धेत दोन रौप्यपदकांची कमाई केली आहे. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल आ. अर्जुनराव खोतकर यांनी भूमी पवार हिचे कौतुक व गुणगौरव करण्यात आला.**

## खरवंडी कासार मुख्य रस्ता व भगवानगड रस्त्याच्या वाहतुकीचे पूल धोकादायक

पाथर्डी । प्रतिनिधी

खरवंडी कासार लोकनेते गोपीनाथ मुंडे चौकातील मुख्य रस्त्याचा देशी दुकाना समोरील पूल तसेच भगवानगड रस्त्याच्या स्मशान घाटातील पूल शेवटच्या घटका मोजत असून राष्ट्रीय महामार्ग २२२ चा पूर्वीचा पूल अत्यंत धोकेदायक बनला असून रस्त्याने चालणेही मुश्किल झाले आहे रात्री अंधारात गाडी चालवत असताना स्मशान घाटातील भगवानगड रस्त्याचा पूल मागील वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे अर्ध्यावर वाहून गेला असून वाहनचालकांना तसेच शेतकरी व्यापारी यांचा दैनंदिन शेती कामासाठी वापराचा रस्ता असल्याने अनेक गंभीर व किरकोळ अपघात या रस्त्यावरील पुलावरती घडले आहेत यामुळे खरवंडी कासार राष्ट्रीय महामार्ग २२२ जुना गोपीनाथ मुंडे चौक लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक ते बायपास असा संपूर्ण रस्ता मंजूर करावा अशी मागणी युवा नेते मयूर काळुसे यांनी केली आहे.

गोपीनाथ मुंडे चौक येथपासून ते अण्णाभाऊ चौक ते भगवानगड स्मशान घाट बायपास या रस्त्यावर अतिक्रमण केल्याने मुख्य बाजारपेठेतील रस्ता अरुंद झाला आहे रविवारचा आठवडे बाजार भरणे किंवा मुख्य बाजारातील रस्त्यावर गटारी आणि घाणीचे साम्राज्य पसरल्याने मुख्य बाजारपेठेतील रस्त्यावरील वाहतुकीची कोंडी आणि व्यापारी वर्गांना मनस्ताप सहन करावा लागत आहे यासाठी ग्रामपंचायत आणि सार्वजनिक बांधकाम विभाग प्रशासन यांच्याकडून अतिक्रमण काढून मुख्य रस्ता मोकळा करण्याची मागणी खरवंडी कासार येथील व्यापारी वर्ग करत आहे.

## अजितदादा कायम महिलांच्या पाठीशी–रिंकल तायड

### राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडीतर्फे जीवनराव पारे विद्यालयात रक्षाबंधन

जालना। प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिनी अजितदादा पवारआणि महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा वैशालीताई नागवडे यांच्या सूचनेनुसार, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडीच्या वतीने जीवनराव पारे विद्यालयात रक्षाबंधन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली महिला आघाडीच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून जीवनराव पारे विद्यालयात रक्षाबंधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष रिंकल तायड यांनी स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला राखी बांधून त्यांच्या स्मृतींना अभिवादन केले.

यावेळी बोलताना रिंकल तायड म्हणाल्या, अजितदादा पवार हे कायम महिलांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. महिलांचा सन्मान, स्वाभिमान, सुरक्षितता आणि सक्षमीकरणाला त्यांनी नेहमीच प्राधान्य दिले. महिलांच्या प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहून त्यांना न्याय देण्याची भूमिका त्यांनी सातत्याने घेतली. रक्षाबंधन हा केवळ भाऊ-बहिणीच्या नात्याचा सण नसून प्रेम, विश्वास, जिव्हाळा आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देणारा सण आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून महिलांच्या सन्मान व सुरक्षिततेबाबत समाजात जनजागृती करण्याचा प्रयत्न असल्याचेही रिंकल तायड यांनी सांगितले. अजितदादांनी महिलांसाठी घेतलेल्या विविध निर्णयांमुळे आणि त्यांच्या संवेदनशील नेतृत्वामुळे महिलांमध्ये त्यांच्याबद्दल आत्मीयता व विश्वासाची भावना निर्माण झाली होती. रक्षाबंधनाच्या निमित्ताने त्यांच्या प्रतिमेला राखी अर्पण करून त्यांच्या कार्याला अभिवादन करण्यात आले. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष रिंकल तायड, मंदा ठोकळ, भारती पाडमुख, मुख्याध्यापक सुभाष पारे, माधव भद्रे, शरद गायकवाड, विजय खंडीभराड, बाबासाहेब शिंदे, प्रमोद बुणगे, अमरसिंग पावरा, विजय पारे, रेखा खरे, अमोल जाधव, मधुकर पालवे, सुहानी आदमाने, दुर्गा ढेमपे, समीक्षा रत्नपारखे, तमन्ना पठाण, अनुष्का आदमाने, दिक्षा आदमाने आदींची उपस्थिती होती.



मागील वर्षी स्वर्गीय अजितदादा पवार यांना प्रत्यक्ष भेटून राखी बांधण्याचा योग आला होता. शहरातील सुमारे ११०० भगिनींनी राख्या पाठवून अजितदादांप्रती आपले प्रेम आणि स्नेह व्यक्त केला होता. यंदा मात्र अजितदादा आपल्यात नसल्याने त्यांची उणीव प्रकर्षाने जाणवत आहे.

रिंकल तायड शहर जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडी, जालना

### जाहीर प्रगटन

**मा. श्री. प्रविण आर. शिंदे दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क. १४३३/२०२६**

**ॲड.के.डी. कसबे**

**बापुराव पि. नामदेव ढेंगे व इतर वि. निरंक**

अर्जदार : १. बापुराव पि.नामदेव ढेंगे, वय ६५ वर्षे, धंदा-शेती, रा. मौजवाडी ता.जि.बीड, २. बाबासाहेब पि. नामदेव ढेंगे, वय-५१ वर्षे, धंदा-शेती, रा.सदर, ३. काशिबाई भ्र.जाकुराम चव्हाण, वय ७० वर्षे, धंदा-घरकाम, रा.सदर, ४. अरुणा भ्र. आश्रुबा भांडवले, वय ६० वर्षे, धंदा घरकाम, रा. कुंभारवाडी ता. गेवराई जि. बीड, ५. कौशल्याबाई भ्र.श्रीराम जाधव, वय-५५वर्षे, धंदा-घरकाम, रा. मौजवाडी ता. जि.बीड, ६. पमिताबाई भ्र.लालासाहेब कदम, वय-५३वर्षे धंदा-धरकाम, रा.सदर

गैरअर्जदार विरुध्द निरंक

प्रकरण:-बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत्त सरस्वती भ्र.नामदेव ढेंगे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाचत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. मयत मयत सरस्वती भ्र.नामदेव ढेंगे हया दिनांक ०८/०३/२०२५ रोजी राहते घरी मौजे मौजवाडी ता.जि.बीड येथे मयत झालेल्या आहेत अर्जदार क्र. १ व २ हे मयताचे मुले असुन अर्जदार क्र. ३ ते ६ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत मयताचे पती यापूर्वीच मयत झालेले आहेत अर्जदारांशिवाय मयतास ईतर कोणीही वारस नाहीत अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्पाअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहु मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा येऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत नामे मयत सरस्वती भ्र. नामदेव ढेंगे रा. मौजवाडी ता. जि. बीड यांचे अर्जदार हे कायदेशीर वारस माणून घोषीत करुन अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी

पुढील तारीख १७/१०/२०२६.

आज दिनांक २९/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**

आदेशावरून,
स्वाक्षरित/-
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

# गुंगीकारक टॅबलेट (बटन गोळ्या) विक्री करणारी टोळी जेरबंद

## ६६०० गोळयांचा अवैध साठा जप्त; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

जालना। प्रतिनिधी

जालना पोलीसांनी सन २०२६ मध्ये अंमली पदार्थाचे सेवन व अंमली पदार्थ बाळगणाऱ्या इसमांवर ३८ गुन्हे दाखल करुन एकुण रु.१६,६०,४२२/- किंमतीचा मुददेमाल जप्त केला आहे. जालना जिल्ह्यात मानवी आरोग्य घातक असलेले व एनडीपीएस घटक प्रतिबंधीत असलेले गुंगीकारक औषधी व टॅबलेट (बटन गोळ्या) विक्री करणारे दिनांक २७/०८/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार यांना माहिती मिळाली की, लक्कडकोट परिसरात एक इसम ०.५ या गोळयांची पाकीटे बेकायदेशीरित्या ताब्यात बाळगुन आहे. त्यावरुन स्था.गु.शा. चे पथकाने छापा कारवाई करुन आरोपी १) जफर अहमद खान



मंजुर अहमद खान, वय ७५ वर्ष रा. कारंजा रोड कटकटपुरा, बीड जि. बीड यास ताब्यात घेवुन त्याच्या ताब्यातुन ०.५ या कंपनीच्या ६६०० गोळयांचे १९८००/- रुपये किंमतीचे ११ बॉक्स जप्त केले आहे व आरोपी विरुध्द सदर बाजार पोलीस ठाणे जालना येथे गु.र.क्र.६९३/२०२६ कलम १२३,२७८ भा.न्यां.सं. सह कलम ८(क), २२(अ) अन्वये गुन्हा दाखल करुन सदर गुन्हयाचा तपास पोउपनि. राजेंद्र वाघ स्था.गु.शा. जालना यांच्याकडे देण्यात आला.गुन्हयाचे तपासात गोळयांचा पुरवठा करणाऱ्या साखळीतील इसम नामे २) सय्यद युसुफ अली सय्यद अली, वय ४४ वर्षे रा. रांजणी ता. घनसावंगी जि. जालना वास राजणी, ता. घनसावंगी, जि. जालना व ३) शिवप्रसाद संतोष बडदमकर, वय २२ वर्षे, रा. सुंद्राईनगर, उघडा महोदव मंदौर जवळ, परभणी जि. परभणी ४) शेख अलीम शेख ईस्माईल, वय २७ वर्ष रा.अपना कॉर्नर शालीमार, परभणी यांना परभणी शहारातुन ताब्यात घेवुन त्यांच्याकडे गुन्हयाच्या अनुषंगाने चौकशी करुन त्यांचा गुन्हयातील सहभाग निष्पन्न झाल्याने चारही आरोपीतांना गुन्हयात अटक करण्यात आलेली असून त्यांना पोलीस कस्टडी रिमांड सह मा. न्यायालयासमक्ष हजर करण्यात आले असून न्यायालयाने आरोपींची दि.०१/०९/२०२६ पावेतो पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केले आहे. सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक श्री. तेघबीर सिंह संधू, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. विक्रम साळी श्री. अनंत कुलकर्णी उपविभागीय पोलीस अधिकारी जालना यांचे मार्गदर्शनाखाली श्री. पंकज जाधव, पोलीस निरीक्षक स्थागुशा सपोनि, श्री. सचिन खामगळ, पोउपनि, श्री. राजेंद्र वाघ, सफौ. सॅम्युअल कांबळे, पोलीस अमलदार रमेश राठोड, रुस्तुम जैवाळ, विजय डिक्कर, प्रभाकर वाघ, इरशाद पटेल, अक्कर धांडगे, प्रदिप करतारे, चालक गणपत पवार, सुनिल पवार, अशोक जाधवर सर्व स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी केली आहे.

# सिरसाळा हद्दीत २० वर्षांपासून सुरू असलेला दोन भावांमधील बांधाचा वाद अखेर मिटला

बीड / सिरसाळा । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील शेतीच्या बांधावरून होणारे वाद, त्यातून निर्माण होणारी भांडणे आणि संभाव्य गुन्हेगारी रोखण्यासाठी बीड जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत यांच्या संकल्पनेतून 'पोलीस आपल्या बांधावर' हा नागरिककेंद्री उपक्रम राबवण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत सिरसाळा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कावळ्याची वाडी येथे गेल्या तब्बल २० वर्षांपासून दोन भावांमध्ये सुरू असलेला शेतीच्या बांधाचा वाद पोलिसांनी सामोपचाराने मिटवला आहे.

कावळ्याची वाडी येथील दोन भावांमध्ये शेतीच्या बांधावरून व हद्दीवरून मागील २० वर्षांपासून तीव्र वाद सुरू होता. या वादातून बांधाचे नुकसान करणे तसेच बांधावरील दगड तक्रारदाराच्या शेतात टाकण्याचे प्रकार घडले होते. या प्रकरणी सिरसाळा पोलीस ठाण्यात एनसी ( . २४७/२०२६ व २४८/२०२६) दाखल करण्यात आली होती.

घटनेचे गांभीर्य ओळखून सिरसाळा पोलीस ठाण्यातील अधिकारी व अंमलदारांनी थेट घटनास्थळीम्हणजेच प्रत्यक्ष शेताच्या बांधावरभेट दिली. पोलिसांनी दोन्ही भावांची बाजू शांतपणे ऐकून घेत वादाची पार्श्वभूमी समजून घेतली. परस्पर संवाद, कायदेशीर मार्गदर्शन आणि समन्वयाच्या जोरावर पोलिसांनी दोन्ही पक्षांमध्ये यशस्वी तोडगा काढत २० वर्षांचा प्रलंबित वाद कायमचा निकाली काढला. पोलिसांच्या या मध्यस्थीमुळे दोन्ही कुटुंबांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे.

**कायदा हातात न घेण्याचे पोलिसांचे आवाहन**

शेतजमिनीच्या हद्दी, बांध, वहिवाटीची वाट किंवा पाणी यावरून वाद उद्भवल्यास नागरिकांनी आपापसात हाणामारी न करता अथवा कायदा हातात न घेता 'पोलीस आपल्या बांधावर' या उपक्रमाचा लाभ घ्यावा आणि सामोपचाराने प्रश्न सोडवण्यासाठी पोलीस प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन बीड जिल्हा पोलिसांच्या वतीने करण्यात आले आहे.



## गजानन विद्यालयात रक्षाबंधन मोठ्या उत्साहात साजरे



नवगण राजुरी । प्रतिनिधी

येथील गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात रक्षाबंधन हा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रशांत पवळ हे होते.

पौर्णिमा निमित्त गजानन विद्यालयात रक्षाबंधनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रथम स्व. केशरकाकूंच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर वृक्षवल्ली आम्हा सोयरे या उक्तीप्रमाणे ◀◀ पान ३ वर

# दोन हायवासह ट्रॅक्टर जप्त; ५७ लाख ४८ हजारांचा मुद्देमाल हस्तगत

गेवराई । प्रतिनिधी

जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात पोलिसांनी सुरू केलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत चकलांबा पोलीस ठाण्याच्या पथकाने बोरगाव व राक्षसभुवन शिवारात धडक कारवाई केली आहे. अवैध वाळू वाहतूक करणारे दोन हायवा ट्रक व एक ट्रॅक्टरसह ८ ब्रास वाळू, असा एकूण तब्बल ५७ लाख ४८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

बोरगाव शिवारात रात्री दोन हायवा पकडले

चकलांबा पोलिसांनी २७ ऑगस्ट रोजी रात्री बोरगाव शिवारात सापळा रचून कारवाई केली. या कारवाईदरम्यान अवैध ५ ब्रास वाळूची वाहतूक करणारा हायवा (क्रमांक १६ ३३२७) व २ ब्रास वाळूची वाहतूक करणारा दुसरा हायवा (क्रमांक २० ०६३९) ताब्यात घेण्यात आला. याप्रकरणी विजय आसाराम हुगे (वय ४२, रा. मुंगी, ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर) आणि अर्जुन उत्तमराव जाधव (वय ४०, रा. बोरगाव, ता. गेवराई) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**राक्षसभुवन येथे ट्रॅक्टरवर कारवाई**

दुसऱ्या कारवाईत, २८ ऑगस्ट रोजी पहाटे ७:०० वाजेच्या सुमारास राक्षसभुवन शिवारात अवैध वाळू वाहतूक करणारा एक ट्रॅक्टर पकडण्यात आला. या कारवाईत ट्रॅक्टरसह एकूण ७ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, आरोपी रोहित नाटकर (रा. राक्षसभुवन, ता. गेवराई) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरू आहे.

पोलीस पथकाची कामगिरी

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख व उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली चकलांबा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन इंगळे, पोलीस उपनिरीक्षक गणेश कऱ्हाडकर, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक अनिल चांदमारे, सहाय्यक फौजदार सोपान वंजारे तसेच चालक पोलीस अंमलदार अक्षय जाधव यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

## राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा: गुणवंत खेळाडू व राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार विजेत्या कविता गित्ते यांचा विशेष गौरव

बीड । प्रतिनिधी

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद, बीड आणि श्री छत्रपती राजर्षी शाहू महाराज प्रबोधन मंडळ संचलित राजर्षी शाहू कन्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालय आणि राजमाता इंग्लिश स्कूल, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने २९ ऑगस्ट रोजी 'राष्ट्रीय क्रीडा दिन' अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.

हॉकीचे जादूगर मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीचे औचित्य साधून आयोजित या कार्यक्रमात निवासी उपजिल्हाधिकारी मा. शिवकुमार स्वामी आणि पोलीस उप



अधीक्षक मा. राजीव नवले यांच्या हस्ते क्रीडा क्षेत्रातील गुणवंत खेळाडू, राष्ट्रीय हॉकी खेळाडू क्षितीजा गव्हाणे, तसेच सन २०२६ चा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार जाहीर झालेल्या साने गुरुजी निवासी शाळा (केज) च्या आदर्श मुख्याध्यापिका श्रीमती कविता गित्ते (कराड) यांचा सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन विशेष गौरव करण्यात आला.

याप्रसंगी जिल्ह्यातील राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय आणि अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत प्राविण्य मिळवलेल्या खेळाडूंचा सन्मान करण्यात आला, तसेच मैदानी, सॉफ्टबॉल व बेसबॉल क्रीडा केंद्रांतील नियमित खेळाडूंना क्रीडा साहित्याचे (किट) वाटप करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी केवळ पदकांसाठी नव्हे, तर उत्तम शारीरिक व मानसिक स्वास्थ्यासाठी खेळाकडे पाहिले पाहिजे. खेळामुळे शिस्त, आत्मविश्वास आणि नेतृत्वगुण विकसित होतात, असे प्रतिपादन निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी केले. पोलीस उप अधीक्षक राजीव नवले यांनी खेळाडूंना मेजर ध्यानचंद यांच्या ◀◀ पान ३ वर


## कारची काच फोडून दोन लाख पळविले; दोन अज्ञात चोरट्यांवर गुन्हा दाखल

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई लातूर रोडवरील साईनाथ स्मार्टसिटी परिसरात घरासमोर उभ्या केलेल्या कारची काच फोडून अज्ञात चोरट्यांनी दोन लाख रुपयांची रोकड लंपास केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी दोन अनोळखी इसमांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

साईनाथ स्मार्टसिटी, लातूर रोड येथील रहिवासी वजनकाटे व्यावसायिक जोतीराम पांडुरंग भिसे (वय ४५ वर्ष) यांनी बँक ऑफ इंडियाच्या अंबाजोगाई शाखेतून दोन लाख रुपये रोख काढले होते. ही रक्कम पांढऱ्या रंगाच्या पिशवीत ठेवून त्यांनी ती कारमध्ये डाव्या बाजूच्या सीटवर ठेवली. त्यानंतर घरासमोरील पत्र्याच्या शेडमध्ये कार पार्क करून ते जेवणासाठी घरात गेले. काही वेळाने खाली येऊन पाहिले असता कारच्या पुढच्या डाव्या बाजूच्या दरवाजाची काच फुटलेली आढळली आणि आतील पैशांची पिशवी गायब होती.

परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता मोटारसायकलवरून आलेल्या दोन ◀◀ पान ३ वर



# पाटोद्यात सोन्याच्या दुकानावर दरोड्याचा प्रयत्न अपयशी; बस स्थानकातून नगराध्यक्षांच्या भावजयीचे ७ तोळे सोने लांबवले

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहर व परिसरात गुन्हेगारांचे मनोबल उंचावले असून, चोरट्यांनी धुमाकूळ घातला आहे. शहरातील मुख्य बाजारपेठेतील एका सोन्याच्या दुकानावर चोरट्याने केलेला धाडसी चोरीचा प्रयत्न अपयशी ठरल्याची घटना ताजी असतानाच, आज (२९ ऑगस्ट) दुपारी १:३० वाजेच्या सुमारास पाटोदा बस स्थानक परिसरातून पाटोदा शहराच्या नगराध्यक्षांच्या भावजयीचे तब्बल ७ तोळे सोने चोरट्याने शिताफीने लांबवले. या लागोपाठ घडलेल्या घटनांमुळे शहरात भीतीचे व चिंतेचे वातावरण पसरले असून पाटोदा पोलिसांच्या सुस्त कार्यपद्धतीवर नागरिकांनी तीव्र प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

### चोरट्यांचा सुळसुळाट असताना पाटोदा पोलीस थंडगार; बंद सीसीटीव्ही अन् ढिसाळ कारभारावर नागरिकांचा तीव्र संताप, एसपी नवनीत कावत यांनी लक्ष देण्याची मागणी

नयन ज्वेलर्सवर धाडसी चोरीचा प्रयत्न अपयशी

मिळालेल्या माहितीनुसार, पाटोदा शहरातील 'नयन ज्वेलर्स' या सोन्याच्या दुकानावर एका भामट्याने चोरी करण्याचा धाडसी प्रयत्न केला. परंतु, प्रसंगावधान आणि स्थानिक नागरिकांच्या सतर्कतेमुळे हा प्रकार उघडकीस आला व चोरट्याचा प्लॅन फसला. दुकानाच्या बाहेरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात (कॅमेरा ०३) आरोपीची संशयास्पद हालचाल व पळून जाण्याचे दृश्य स्पष्ट कैद झाले आहे.

बस स्थानकावर भरदुपारी नगराध्यक्षांच्या भावजयीचे दागिने लांबवले

सोन्याच्या दुकानातील चोरीचा प्रयत्न अपयशी ठरल्यानंतर काही वेळातच, आज दुपारी १:३० वाजेच्या सुमारास पाटोदा बस स्थानकात चोरट्याने दुसरी मोठी घटना घडवून आणली. नगर पाटोदा शहराच्या नगराध्यक्षांच्या भावजयी बस स्थानक परिसरात असताना चोरट्याने संधी ◀◀ पान ३ वर



# रक्षाबंधनानिमित्त जागर प्रतिष्ठानकडून अनोखी ओवाळणी

**किसन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली २५० महिलांना सॅनिटरी पॅडचे मोफत वाटप**

माजलगाव । प्रतिनिधी

रक्षाबंधनानिमित्त बहिणींच्या आरोग्याची काळजी घेत जागर प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने अनोख्या सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. जागर प्रतिष्ठानच्या वैद्यकीय मदत कक्षाच्या माध्यमातून ''जागर आरोग्यसखी अभियान'' राबविण्यात आले. या अभियानांतर्गत २५० महिलांना सॅनिटरी पॅडचे मोफत वाटप करण्यात आले.

जागर प्रतिष्ठानचे अध्यक्ष किसन चव्हाण पाटील यांच्या



मार्गदर्शनाखाली झालेल्या या उपक्रमात महिलांच्या आरोग्याबाबत जनजागृती करण्यात आली. मासिक पाळीच्या काळात घ्यावयाची स्वच्छता, आरोग्याची काळजी तसेच मासिक पाळीशी संबंधित गैरसमज याबाबत महिलांना डॉ.जनक चौरे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी ''महिलांच्या आरोग्याची काळजीहिच बहिणींच्या सन्मानाची राखी!'' हा संदेश देत रक्षाबंधनाचा उत्सव सामाजिक बांधिलकीने साजरा करण्यात आला. केवळ राखी बांधून न थांबता बहिणींच्या आरोग्यासाठी प्रत्यक्ष मदतीचा हात देण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला.

या उपक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

जागर प्रतिष्ठानच्या या उपक्रमातून महिलांच्या आरोग्याचा प्रश्न समाजाच्या केंद्रस्थानी आणण्याबरोबरच गरजू महिलांना प्रत्यक्ष मदत करण्याचा आदर्श निर्माण ◀◀ पान ३ वर

# अक्षय मुंदडा यांच्या हस्ते विविध विकासकामांचे उत्साहात उद्घाटन

केज । प्रतिनिधी

ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन मान्यवरांनी येथे आयोजित विकासकामांच्या लोकार्पण व उद्घाटन सोहळ्यात केले. स्थानिक विकास निधीच्या माध्यमातून पूर्ण झालेल्या विविध विकासकामांचा लोकार्पण सोहळा आणि नामफलक अनावरण मोठ्या उत्साहात पार पडले.



कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते कोनशिलेचे अनावरण करण्यात आले. त्यानंतर आयोजित सभेमध्ये प्रमुख पाहुण्यांचे ग्रामस्थांच्या वतीने भव्य पुष्पहार घालून व शाल-श्रीफळ देऊन जंगी स्वागत व सत्कार करण्यात आला.

**विकासाची गंगा तळागाळापर्यंत पोहोचवणार**

यावेळी उपस्थित जनसमुदायाला ◀◀ पान ३ वर

# पाटोदा येथे हिंदू महिलांचे मोबाईल क्रमांक मिळवून त्रास देणाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी; पोलीस ठाण्यात निवेदन सादर

पाटोदा । प्रतिनिधी :

हिंदू मुली व महिलांचे मोबाईल क्रमांक विविध माध्यमांतून बेकायदेशीरपणे मिळवून त्यांच्या परवानगीशिवाय संपर्क साधणे, अश्लील संदेश पाठवणे अथवा त्रास देणाऱ्या समाजकंटकांवर तातडीने कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी पाटोदा पोलीस ठाण्यात निवेदन सादर करण्यात आले आहे.

पाटोदा पोलीस निरीक्षकांना दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात



आले आहे की, काही विशिष्ट समाजघटकातील व्यक्तींकडून मुली व महिलांचे मोबाईल क्रमांक त्यांच्या नकळत व परवानगीशिवाय मिळवून त्यांच्याशी संपर्क साधण्याचे प्रकार वाढीस लागले आहेत. विशेषतः ऑनलाईन पार्सल/कुरिअर सेवा, मोबाईल रिचार्ज आणि मोबाईल दुरुस्तीच्या माध्यमातून ग्राहकांच्या नंबरचा गैरवापर करून मुलींशी संपर्क साधला जात असल्याचा गंभीर आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

अशी घडली घटना

निवेदनात पुढे नमूद केल्यानुसार, २६ ऑगस्ट २०२६ रोजी एका महिलेचा मोबाईल क्रमांक पार्सल किंवा कुरिअर सेवेतून मिळवून तिच्या मोबाईलवर रात्रीच्या सुमारास अश्लील भाषेत संदेश पाठवून मानसिक त्रास देण्याचा निंदनीय प्रकार घडला. संबंधित महिलेचा मोबाईल क्रमांक नेमका कोणत्या पार्सल किंवा कुरिअर सेवेतून लीक झाला, याचा सखोल तपास करून संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

प्रमुख मागण्या:

ऑनलाईन पार्सल आणि कुरिअर सेवा क्षेत्रात काम करणारे मालक, कर्मचारी व संबंधित व्यक्तींची कसून चौकशी करावी.

ग्राहकांच्या गोपनीय मोबाईल क्रमांकाचा गैरवापर होत आहे का, याची ◀◀ पान ३ वर

## प्रभाग क्रमांक १० मध्ये सांडपाण्याच्या समस्येला मिळणार कायमस्वरूपी दिलासा!

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी नगरपंचायतीच्या प्रभाग क्रमांक १० मध्ये गेल्या काही काळापासून नागरिकांना भेडसावणाऱ्या सांडपाण्याच्या समस्येच्या निवारणासाठी आता ठोस पाऊल उचलण्यात आले आहे. नागरिकांची गैरसोय लक्षात घेऊन नगरसेवक अक्षय धोंडे यांनी आमदार सुरेश आण्णा धस यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करून या कामासाठी निधी उपलब्ध करून घेतला आहे.

उपलब्ध झालेल्या निधीतून प्रभागातील नाल्यांमध्ये पाईप टाकण्याच्या ◀◀ पान ३ वर



**आमदार सुरेश आण्णा धस यांच्या पाठपुराव्यातून निधी उपलब्ध; नगरसेवक अक्षय धोंडे यांच्या प्रयत्नातून नाल्यांमध्ये पाईप टाकण्याचे काम प्रगतीपथावर**

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26